



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक ८५ * नांदेड * मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# नांदेडमध्ये विजांचा कडकडाट व वादळी वाऱ्यासह पाऊस

## वीज पुरवठा खंडित झाल्याने शहर अंधारात



**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवलेल्या अंदाजानुसार नांदेड शहर व परिसरात सोमवार, दि. ३० मार्च रोजी रात्री दहा वाजता सर्वत्र वादळी वाऱ्यासह आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडला.

नांदेड शहर आणि जिल्ह्यात रात्री दहा वाजेच्या सुमारास जोरदार पावसाला सुरुवात झाली. या पावसामुळे शेतकऱ्यांची शहरातील नवीन मोंढा भागात शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणून ठेवलेले धान्य उचलण्यासाठी व्यापाऱ्यांनाही कसरत करावी लागली. जिल्ह्यातील मुदखेड, अर्धापूर, सोनखेड, वाजेगाव, ब्राह्मणवाडा, भोकर, हिमायतनगर, लिंबगाव, हदगाव या भागात पावसाने जोरदार हजेरी लावली. नांदेड शहरातही विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस पडला. रेल्वे स्थानक, मध्यवर्ती बस स्थानकावर आलेले प्रवासी अडकले. वादळी वाऱ्यामुळे काही भागात विजांच्या तारा तुटल्यामुळे विज पुरवठा खंडित करावा लागला. रात्री उशिरापर्यंत शहर अंधारातच होते.

या पावसामुळे शेतात काढणीला आलेला गहू, हरभरा, टरबूज, खरबूज, केळी, पपई यासोबतच फुल शेती आणि बागायती शेतीला मोठा फटका बसला आहे. मागील तीन चार दिवसांपासून तापमानात प्रचंड मोठ्या प्रमाणात उकाडा जाणवत होता, तो काहीसा दूर होणार आहे.

### नांदेड जिल्ह्याला तीन दिवस येलो अलर्ट जारी

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी ३० मार्च रोजी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी ३१ मार्च २०२६ तसेच १ व ३ एप्रिल २०२६ या दोन दिवसांसाठी येलो अलर्ट जारी केलेला आहे. हे तीन दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि नागरिकांनी खबरदारी घ्यावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# राज्यात भर उन्हाळ्यात अवकाळी पावसाचा कहर

- जालन्यात वीज पडून दोघांचा मृत्यू
- शेतकऱ्यांसाठी पुढील ४८ तास धोक्याचे

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात उन्हाळ्याची तीव्रता वाढत असतानाच अचानक अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. दुपारच्या वेळेतच मुसळधार पाऊस, गारपिट आणि वादळी वाऱ्यांनी अनेक जिल्ह्यांना तडाखा दिला असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच जालना जिल्ह्यात वीज पडून दोघांचा मृत्यू झाल्याचीही घटना घडली आहे. हवामान विभागाकडून पुढील ४८ तास राज्यासाठी धोक्याचे असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

राज्याच्या विविध भागात अवकाळी पावसानं धुमाकूळ घातला आहे. काही भागात वादली पाऊस झाला तर काही भागात मोठ्या प्रमाणात गारपीट झाली आहे. यामुळं शेती पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. दरम्यान, अवकाळी पावसामुळं काही ठिकाी वीज पडून जीवितहानी झाली आहे तर काही ठिकाणी जनावरांचा मृत्यू झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातल्या महाकाळा गावा जवळ वीज पडून दोन तरुणांचा मृत्यू झाला



आहे. सायंकाळी विजेच्या गडगडाटासह अंबड तालुक्यातील अनेक भागात जोरदार पाऊस झाला.

यासह धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातही अवकाळी पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे कांदा, मका, गहू आणि हरभरा पिकांवर परिणाम होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

नाशिकमध्येही जोरदार वाऱ्यासह पाऊस आणि गारपीट झाली. अनेक भागांत गारांचा खच साचल्याचे चित्र दिसून आले. या अचानक आलेल्या अस्मानी संकटामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. सिन्नर परिसरातही पावसाची नोंद झाली.

# माघार घेऊ, पण इराणच्या तेल विहिरी, जल शुद्धिकरण प्रकल्प, खार्ग बेटही नष्ट करणार

## डोनाल्ड ट्रम्प यांची विध्वंसाची भाषा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** इराणमधील नव्या राजवटीसोबत चर्चा सुरू आहे. लवकरच करार होईल आणि होर्मुझ सामुद्रधुनी खुली केली जाईल. पण, असे झाले नाहीतर अमेरिकाइराणमधील मुक्काम संपवण्यापूर्वी इराणला उद्धवस्त करेल. त्यांच्या तेल विहिरी, खार्ग बेट आणि इतकंच नाही, त्यांचे जलशुद्धिकरण प्रकल्पही उडवू, अशी थेट धमकी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला दिली आहे.



ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, इराणमधील आमची लष्करी कारवाई थांबवण्यासाठी अमेरिका एका नवीन आणि अधिक समजूतदार अशा राजवटीसोबत गंभीर चर्चा करत आहे. यात मोठी प्रगतीही झाली आहे, परंतु जर कोणत्याही कारणास्तव लवकरच करार होऊ शकला नाही, जो बहुधा होईलच.

डोनाल्ड ट्रम्प यांनी पुढे म्हटले आहे की, आणि जर होर्मुझची सामुद्रधुनी तातडीने 'व्यापारासाठी खुली' केली गेली नाही, तर आम्ही इराणमधील आमचा छानसा 'मुक्काम' संपवू, पण त्यापूर्वी त्यांचे सर्व वीज निर्मिती प्रकल्प, तेलाच्या विहिरी आणि खार्ग बेट आणि शक्यतो समुद्राचे पाणी गोडे करणारे सर्व प्रकल्प, ज्यांना आम्ही हेतुपुरस्सर अद्याप 'हात लावलेला' नाही उडवून देऊ आणि पूर्णपणे नष्ट करू, असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी टूथ सोशल या सोशल मीडिया साईटवर एक पोस्ट करत इराणसोबत सुरू असलेल्या चर्चेबद्दल माहिती दिली आहे. ट्रम्प यांनी लवकरच करार होईल, असा दावा केला आहे. त्याचबरोबर होर्मुझ सामुद्रधुनी व्यवसायासाठी खुली केली गेली नाही, तर सैन्य माघारीपूर्वी सगळं नष्ट करू असेही म्हटले आहे.

# साताऱ्याचे पोलीस अधीक्षक तुषार दोशी सक्तीच्या रजेवर

**मुंबई (प्रतिनिधी)–** सातारा जिल्हा परिषद राडा प्रकरण सातारा पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांना भोवले आहे. सातारा पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांना सातारा जिल्हा परिषद राडा प्रकरणाची चौकशी होईपर्यंत सक्तीच्या रजेवर जाण्याचे आदेश देण्यात आले आहेत. चौकशी होईपर्यंत अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैशाली कडुकर यांच्याकडे सातारा पोलीस अधीक्षक पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

तुषार दोशी हे महाराष्ट्र पोलीस दलातील एक वरिष्ठ आयपीएस अधिकारी आहेत, जे सध्या सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडणुकीदरम्यान झालेल्या गदारोळामुळे आणि राजकीय संघर्षामुळे चर्चेत आहेत. त्यांच्यावर विधानपरिषदेत निलंबनाची घोषणा झाली होती.

# महाराष्ट्रातील केळीचे एक हजार कंटेनर इराणमध्ये अडकले; शेतकऱ्यांचे नुकसान

**मुंबई (प्रतिनिधी)–** आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाचा फटका आता महाराष्ट्रातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना बसताना दिसत आहे. जेएनपीए बंदरातून इराणकडे पाठवलेले जवळपास ८०० ते १ हजार केळीचे कंटेनर तिथेच अडकून पडले आहेत.

युद्ध सुरू झाल्यानंतर पहिल्याच आठवड्यात गल्फ देशांकडे जाणारे १२०० ते १५०० कंटेनर जेएनपीए बंदरात अडकले होते. सुमारे १५ दिवसांनी यातील काही कंटेनर इराणकडे पाठवण्यात आले, तर काही स्थानिक बाजारात विक्रीसाठी वळवण्यात आले.

इराणमध्ये कंटेनर पोहोचल्यानंतर शिपिंग कंपन्यांनी युद्धाचा आधार घेत भाड्यात मोठी वाढ केली. आधी २ ते ३ लाख रुपये असलेलं भाडं थेट १५ लाख रुपयांपर्यंत नेण्यात आलं. या वाढलेल्या खर्चामुळे निर्यातदार आणि शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत.

इराणमध्ये पोहोचलेले जवळपास १ हजार कंटेनर शिपिंग कंपन्यांनी अडवून ठेवल्याने केळी खराब होऊ लागली आहेत. एकीकडे वाढलेलं भाडं आणि दुसरीकडे खराब होणारा माल, यामुळे शेतकऱ्यांचं दुहेरी नुकसान होत आहे. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या सोलापूरमधील ५० ते ६० शेतकऱ्यांनी शिपिंग कंपन्यांमध्ये धडक देत जाब विचारला. मात्र काही कंपन्यांनी पोलिसांना बोलावून शेतकऱ्यांवर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्याचं समोर आलं आहे.

# आता आमचा फक्त भारतच मित्र देश -इराण

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** इराणमधील सरकारी सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार इराणने भारताला आपला मित्र देश म्हटलं आहे. पाकिस्तानवर आमचा विश्वास नाही, मात्र अमेरिकेसोबत युद्धविरामाच्या मध्यस्थीसाठी आम्ही भारतावर भरोसा करू शकतो असं इराणने म्हटलं आहे.

भारत युद्धविरामाच्या चर्चेत सहभागी होऊ शकतो. पाकिस्तानकडून अमेरिकेसोबतच्या चर्चेसाठी पुढाकार घेण्यात येत आहे, मात्र आमचा पाकिस्तानवर विश्वास नाही. पाकिस्तानकडून ज्या पद्धतीने प्रयत्न होत आहे, ते पाहून आम्हला वाटंत की पाकिस्तान बळजबरीने युद्धविरामाचं श्रेय घेऊ इच्छित आहे, असंही यावेळी इराणने म्हटलं आहे. दरम्यान डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून वारंवार असा दावा करण्यात येत आहे की, इराणने युद्धविरामासाठी पुढाकार घेतला आहे, त्यांना युद्धविराम करायचा आहे. यावर देखील इराने आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

# महिनाभरात ७ पिस्तूल, ७६ काडतुसांसह ३ मॅक्झिन जप्त

## १७ जणांवर गुन्हा दाखल; एलसीबीची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस ठाण्याच्यावतीने शस्त्र पुरवठाधारक गुन्हेगारांविरूद्ध संयुक्त विशेष मोहिम राबवून महिन्याभरात ७ पिस्तूल, ७६ काडतूस, ३ मॅक्झिन जप्त करण्यात आले आहेत. या दरम्यान ७ गुन्ह्यांमध्ये १७ आरोपीवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिलेल्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस ठाणे यांनी शहर व जिल्हा परिसरामध्ये १ मार्च ते ३० मार्च २०२६ दरम्यान परराज्यातून अवैध अग्निशस्त्र पुरवठा करणाऱ्या विरोधात विशेष मोहीम राबविली होती. त्यात बेकायदेशीर शस्त्रांचे पुरवठादार, खरेदीदार, मध्यस्थ तसेच संपूर्ण साखळी विरुद्ध ही मोहीम राबविण्यात आली होती. बेकायदेशीर शस्त्र समाजासाठी गंभीर धोका असून जिल्ह्यात पूर्वी अशा शस्त्रांच्या घटनांचे प्रमाण जास्त होते. तसेच गोळीबाराच्या घटनाही घडत होत्या मात्र गत १ ते २ वर्षांपासून या घटनांमध्ये लक्षणीय घट झाली आहे.

कोम्बिंग ऑपरेशन व सर्च ऑपरेशन राबविण्यात येत आहेत. १ मार्च ते ३० मार्च दरम्यान अग्निशस्त्राबाबत ७ गुन्हे दाखल करण्यात आले असून ७ पिस्टल, ७६ काडतुसं, ३ मॅक्झिन जप्त करण्यात आले असून १७ आरोपींवर गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. नांदेड पोलिसांनी स्वतंत्र प्रिव्हेंटिव्ह कारवाई सेल स्थापन केले असून त्यात १ पोलीस निरीक्षक, १ सहाय्यक पोलीस निरीक्षक व ४ पोलीस कर्मचारी तसेच तांत्रिक व लॉजिस्टिक साहित्य उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# लष्कर-ए-तोयबाचा मास्टरमाईंड जेरबंद

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** राजधानी दिल्लीला हादरवून सोडण्याचा दहशतवाद्यांचा कट दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने अत्यंत चातुर्याने उधळून लावला आहे. लष्कर-ए-तोयबा या प्रतिबंधित संघटनेचा अत्यंत प्रभावशाली हँडलर शब्बीर अहमद लोन याला अटक करण्यात आली आहे.

शब्बीर अहमद हा साधा दहशतवादी नसून, तो बांगलादेशातून भारतातील दहशतवादी हालचालींचे नियंत्रण करत होता. या अटकेमुळे पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआय कशा प्रकारे भारतीय सीमांच्या बाहेरून कट रचत आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.




# नांदेड विभागात रेल्वे गाड्या व स्थानकांवर अनाधिकृत विक्रीविरोधात विशेष मोहीम

**नांदेड (प्रतिनिधी)–** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागामार्फत मुख्यालयाच्या सूचनांनुसार दिनांक २२ ते २८ मार्च या कालावधीत रेल्वे गाड्या व स्थानकांवर अनधिकृत विक्रीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेचा उद्देश अनधिकृत विक्रीला आळा घालणे तसेच प्रवाशांना सुरक्षित, स्वच्छ व नियमानुसार सेवा उपलब्ध करून देणे हा होता.



या मोहिमेदरम्यान वाणिज्य निरीक्षक व तिकीट तपासणी कर्मचारी यांनी विभागातील विविध मार्गांवर सघन तपासणी केली. त्यामध्ये वाशीम अकोला, परभणी परतूर, परभणी परळी, जालना छत्रपती संभाजीनगर, नांदेड आदिलाबाद, नांदेड वाशीम तसेच छत्रपती संभाजीनगर मनमाड या विभागांचा समावेश होता.

या संयुक्त कारवाईदरम्यान एकूण ३५ अनधिकृत विक्रेते/फेरीवाले आढळून आले असून त्यांच्यावर रेल्वे नियमांनुसार कारवाई करण्यात आली. या कारवाईत ईएफटीद्वारे एकूण १३ हजार ८६० रुपये इतका दंड वसूल करण्यात आला.

प्रवाशांना स्वच्छ व सुरक्षित प्रवासाचा अनुभव मिळावा, अनधिकृत व अस्वच्छ खाद्यपदार्थांची विक्री रोखावी आणि स्थानक व रेल्वे गाड्यांमध्ये शिस्त राखावी यासाठी नांदेड विभागाकडून अशा प्रकारच्या मोहिमा नियमितपणे राबविण्यात येत असतात. फक्त अधिकृत विक्रेत्यांकडूनच खाद्यपदार्थ खरेदी करावेत तसेच रेल्वे स्थानके व गाड्यांमध्ये स्वच्छता, शिस्त आणि सुरक्षितता राखण्यासाठी रेल्वे प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन दक्षिण मध्य रेल्वे यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# ९४ हजार मेट्रिक टन एलपीजी घेऊन दोन टँकर भारताकडे रवाना

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** मागील एक महिन्यापासून पश्चिम आशियात अमेरिका, इस्रायल विरुद्ध इराण असे युद्ध सुरू आहे. या युद्धामुळे अनेक देश तेल आणि गॅसच्या टंचाईचा सामना करत आहे. पण भारतात पुरेसे पेट्रोल, डिझेल उपलब्ध आहे. देशातील एलपीजीचा साठाही समाधानकारक आहे. एकीकडे ही सुसह्य अशी स्थिती असतानाच देशात लवकरच ९४ हजार मेट्रिक टन डझ्रऋ घेऊन दोन टँकर पोहोचणार आहेत. 'बीडल्ब्यू टीवायआर' आणि 'बीडब्ल्यू ईएलएम' हे टँकर अनुक्रमे ३१ मार्च रोजी मुंबईत आणि १ एप्रिल रोजी न्यू मँगलोर (नवे मंगळुरू) येथे पोहोचण्याची शक्यता आहे.

युद्धामुळे होर्मुझ सामुद्रधुनीमार्गे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय तेल व्यापारावर परिणाम झाला असताना भारतासाठी आनंदाची बातमी आली आहे. ऐन युद्ध काळात अरुंद अशा होर्मुझ सामुद्रधुनीतून भारतासाठी ९४ हजार मेट्रिक टन एलपीजी घेऊन दोन टँकर



निघाले आहेत. या टँकरनी सामुद्रधुनी पार केली असून लवकरच ते भारतात पोहोचणार आहेत. पश्चिम आखाती क्षेत्रात अजूनही ४८५ भारतीय खलाशांसह भारताचा ध्वज असलेली एकूण १८ जहाजं अद्याप समुद्रात आहेत. भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा एलपीजी आयातदार देश आहे. भारतात गेल्या वर्षी ३३.१५ दशलक्ष टन गॅसचा वापर केला गेला. भारताच्या एकूण गरजेपैकी सुमारे ६० टक्के गॅस हा आयात केला जातो. यामुळे ९४ हजार मेट्रिक टन एलपीजी घेऊन दोन टँकर देशात पोहोचल्याने भारतातील एलपीजीच्या साठ्यात आणखी वाढ होणार आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

## सन्मानाने वृद्धत्वाकडे : काळाची गरज

वृद्धत्व हा केवळ जैविक प्रक्रियेचा अपरिहार्य टप्पा आहे, अशी सर्वसाधारण समजूत आजही समाजात दृढ आहे. परंतु अलीकडे बीएमसी गॅरिएट्रिक्स या आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिकात प्रकाशित झालेल्या अभ्यासाने या समजुतीला महत्त्वपूर्ण छेद दिला आहे. या संशोधनातून स्पष्ट होते की, वृद्धत्व म्हणजे फक्त वय वाढणे नाही; तर तो दैनंदिन सवयी, आरोग्य, सामाजिक सहभाग आणि सन्मान यांचा एकत्रित अनुभव आहे. भारतासारख्या देशात, जिथे लोकसंख्येचा वृद्ध घटक झपाट्याने वाढत आहे, तिथे या वास्तवाची दखल घेणे अत्यावश्यक ठरते. या अभ्यासाचा केंद्रबिंदू अत्यंत साधा, पण प्रभावी आहे, वृद्ध व्यक्तीचा दिवस कसा जातो, यावर त्याच्या आयुष्याची गुणवत्ता मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. योग्य आहार, नियमित शारीरिक हालचाल आणि सामाजिक संवाद हे घटक वृद्धावस्थेतील शारीरिक व मानसिक आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. तरीही सार्वजनिक आरोग्य धोरणांमध्ये या मूलभूत गोष्टींना अपेक्षित प्राधान्य दिले जात नाही, ही चिंताजनक बाब आहे. आपल्या देशामध्ये वृद्धत्वाचा अनुभव 'सन्मानाने दीर्घायुष्य' असा नसून अनेकदा 'अशक्तपणा, एकाकीपणा आणि दीर्घकालीन आजारांचे ओझे' आणि कुटुंबावरील ओझे असा होताना दिसतो. लाखो वृद्ध नागरिकांची सकाळ ही निष्क्रियता, अपुरा आहार आणि सामाजिक एकाकीपणाने सुरू होते. ही केवळ वैयक्तिक जीवनशैलीची समस्या नसून, ती व्यापक व्यवस्थात्मक दुर्लक्षाचे द्योतक आहे. जेव्हा दैनंदिन जीवनातील लहान-सहान सवयीच अधोगतीचे कारण ठरतात, तेव्हा ही समस्या वैयक्तिक न राहता सामाजिक आणि शासकीय पातळीवरील अपयश ठरते. या पार्श्वभूमीवर, या अभ्यासाने 'उपचारापेक्षा प्रतिबंध' या तत्त्वावर भर दिला आहे. संतुलित आहार, मध्यम स्वरूपाचा व्यायाम आणि सामाजिक सक्रियता या साध्या सवयी वृद्धावस्थेतील अपंगत्व लांबवू शकतात आणि आरोग्य व्यवस्थेवरील ताण कमी करू शकतात, हे संशोधन पुन्हा अधोरेखित करते. परंतु वास्तवात, आपली धोरणे अजूनही उपचारकेंद्रित आहेत. वृद्धांच्या आरोग्याच्या प्रतिबंधात्मक उपायांकडे दुर्लक्ष केले जात आहे, ही गंभीर त्रुटी आहे. याशिवाय वृद्धत्वासोबत इतर जोखमीचे घटकही जोडले जातात. अनेक वृद्ध व्यक्ती विविध औषधांवर अवलंबून असतात तसेच दीर्घकालीन आजारांचे योग्य व्यवस्थापन होत नाही. या परिस्थितीत निष्क्रिय जीवनशैली आणि अपुरा पोषण यांची भर पडल्यास, शारीरिक आणि मानसिक क्षमतांमध्ये झपाट्याने घसरण होते. परिणामी, ही समस्या केवळ व्यक्तीपुरती मर्यादित राहत नाही, तर कुटुंब आणि आरोग्य व्यवस्थेवरही मोठा ताण निर्माण करते. मात्र, प्रश्न हा नाही की आपल्याला ही समस्या समजते का; तर प्रश्न आहे की आपण त्यावर कृती करण्यास तयार आहोत का? भारतातील शहरी नियोजनात वृद्धांसाठी अनुकूल जागांचा अभाव आहे. सार्वजनिक ठिकाणी सुरक्षित चालण्याचे मार्ग, व्यायामासाठी खुली जागा किंवा सामाजिक संवादासाठी केंद्रे यांचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. त्याचप्रमाणे, समुदाय आरोग्य कार्यक्रमांमध्ये वृद्धांच्या समुपदेशनाला फारसे महत्त्व दिले जात नाही. सामाजिक सुरक्षा योजनाही अपुऱ्या आणि विस्कळीत स्वरूपात अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत, वृद्धांनी स्वतःहून 'आरोग्यदायी जीवनशैली' स्वीकारावी, ही अपेक्षा ठेवणे म्हणजे शासनाची जबाबदारी टाळण्यासारखे आहे. वृद्धांच्या सन्मानपूर्ण जीवनासाठी आवश्यक पायाभूत सुविधा आणि आधारव्यवस्था निर्माण करणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. यासाठी सर्वंकष धोरणात्मक बदलांची आवश्यकता आहे. प्रथम, सार्वजनिक आरोग्य धोरणांमध्ये जेरियाट्रिक (वृद्ध) आरोग्याला स्वतंत्र आणि महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे. प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देत, आहार, व्यायाम आणि मानसिक आरोग्य याबाबत जनजागृती मोहीम राबवणे गरजेचे आहे. दुसरे म्हणजे, शहरी व ग्रामीण भागात वृद्धांसाठी अनुकूल पायाभूत सुविधा उभारल्या पाहिजेत. जसे की, उद्याने, चालण्यासाठी सुरक्षित मार्ग आणि सामाजिक उपक्रमांची केंद्रे. तिसरे म्हणजे, समुदाय स्तरावर वृद्धांच्या सामाजिक सहभागाला चालना देणे आवश्यक आहे. स्वयंसेवी संस्था, स्थानिक प्रशासन आणि कुटुंब या सर्वांनी मिळून वृद्धांना एकाकीपणातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. चौथे म्हणजे, आरोग्य व्यवस्थेत वृद्धांसाठी विशेष सेवा आणि समुपदेशन उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, ज्यामुळे त्यांचे आरोग्य अधिक चांगल्या प्रकारे व्यवस्थापित होऊ शकेल. म्हणूनच वृद्धत्वाकडे पाहण्याची समाजाची दृष्टी बदलण्याची गरज आहे. त्यांना या वयामध्ये मानसिक आधार देणे अत्यंत गरजेचे आहे. प्रेम आणि सहानुभूती न मिळाल्याने अशा वृद्धांची प्रकृती ढासळून ते अकाली मृत्युमुखी पडण्याचे प्रमाण वाढते. वृद्ध व्यक्ती ह्या अडगळीच्या वस्तू नसून किंवा ते समाजाचे ओझे नसून अनुभव आणि ज्ञानाचा अमूल्य ठेवा आहेत. त्यांना सन्मानाने, स्वावलंबीपणे आणि आनंदाने जगता यावे यासाठी समाजाने आणि शासनाने संयुक्तपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. या संदर्भात वेळेवर योग्य पावले उचलली नाहीत, तर वृद्धत्वाचा प्रश्न अधिक गंभीर होईल. त्यामुळेच या निष्कर्षांना धोरणांमध्ये समाविष्ट करून, 'सन्मानाने वृद्धत्व' हे केवळ स्वप्न न राहता वास्तवात उतरवणे ही आजची सर्वात मोठी गरज आहे.

# महावीर : अहिंसेचे तेजस्वी दीप



मानवजातीच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की ज्यांनी आपल्या विचारांनी, तत्त्वज्ञानाने आणि आचरणाने संपूर्ण मानवजातीला एक नवी दिशा दिली. अशा तेजस्वी आणि कालातीत व्यक्तिमत्त्वांमध्ये भगवान महावीर यांचे स्थान अत्यंत उंच आहे. चैत्र महिन्यात साजरी होणारी महावीर जयंती ही केवळ धार्मिक उत्सव नसून ती मानवी मूल्यांचा जागर करणारी, आत्मपरीक्षणाची प्रेरणा देणारी आणि नैतिकतेचा मार्ग दाखवणारी एक महत्त्वपूर्ण पर्वणी आहे. आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण जीवनात महावीरांचे विचार अधिकच सुसंगत आणि आवश्यक वाटतात.

भगवान महावीरांचा जन्म इ.स.पूर्व ५९९ मध्ये वैशालीजवळील कुंडलपूर येथे झाला. बालपणापासूनच महावीरांचा स्वभाव अत्यंत शांत, संयमी आणि करुणामय होता. त्यांना सांसारिक सुखांपेक्षा आत्मिक समाधान अधिक महत्त्वाचे वाटत असे. लहान वयातच त्यांनी समाजातील दुःख, अन्याय आणि विषमता यांचा सखोल विचार केला. त्यांच्या मनात सतत एक प्रश्न घोळत होता की मानवाला खरे सुख कसे मिळेल? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याच्या प्रयत्नातूनच त्यांच्या जीवनाला एक वेगळी दिशा मिळाली.

वयाच्या तिसाव्या वर्षी त्यांनी सर्व सांसारिक बंधनांचा त्याग करून तपश्चर्येचा मार्ग स्वीकारला. हा निर्णय अत्यंत कठीण होता, कारण त्यासाठी त्यांना कुटुंब, संपत्ती आणि सर्व सुखसुविधांचा त्याग करावा लागला. त्यांनी जवळपास बारा वर्षे अत्यंत कठोर साधना केली. या काळात त्यांनी उपास, ध्यान, मौन आणि आत्मसंयम यांचा कठोर अभ्यास केला. अनेक अडचणी, संकटे आणि अपमान सहन करूनही त्यांनी आपला मार्ग सोडला नाही. अखेरीस त्यांनी कैवल्यज्ञान प्राप्त केले आणि 'महावीर' म्हणून ओळखले जाऊ लागले.

महावीरांचे तत्त्वज्ञान अत्यंत व्यापक आणि जीवनोपयोगी आहे. त्यांनी पंचमहाव्रतांचा उपदेश केला. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह. या पाच तत्त्वांमध्ये संपूर्ण नैतिक जीवनाचा सार दडलेला आहे. अहिंसा हे त्यांच्या तत्त्वज्ञानाचे केंद्रस्थान आहे. त्यांनी केवळ शारीरिक हिंसा टाळण्याचा उपदेश केला नाही, तर मन, वाणी आणि कृतीतून कोणालाही दुखावू नये, असा व्यापक संदेश दिला. त्यांच्या मते, प्रत्येक जीवामध्ये आत्मा आहे आणि प्रत्येकाला जगण्याचा समान अधिकार आहे. सत्य हा दुसरा महत्त्वाचा सिद्धांत आहे. महावीरांनी सत्याला सर्वोच्च स्थान दिले. त्यांनी सांगितले की सत्य म्हणजे केवळ खोटे न बोलणे नव्हे, तर न्याय, प्रामाणिकपणा आणि नैतिकता यांचे पालन करणे होय. आजच्या समाजात, जिथे असत्य आणि फसवणूक वाढत आहे, तिथे सत्याचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे.

अस्तेय म्हणजे चोरी न करणे. परंतु त्याचा अर्थ केवळ भौतिक वस्तूंची चोरी टाळणे एवढाच नाही, तर दुसऱ्याच्या हक्कावर अतिक्रमण न करणे, अन्यायाने लाभ मिळवू नये, असा व्यापक अर्थ त्यामध्ये अंतर्भूत आहे. ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह ही तत्त्वे मानवी जीवनाला संयम आणि संतुलन शिकवतात. ब्रह्मचर्य म्हणजे इंद्रियसंयम, तर अपरिग्रह म्हणजे अनावश्यक वस्तूंचा त्याग. आजच्या उपभोगवादी संस्कृतीत अपरिग्रहाचा संदेश अत्यंत महत्त्वाचा आहे.

महावीरांनी 'अनेकांतवाद' हा अत्यंत महत्त्वाचा सिद्धांत मांडला. या तत्त्वानुसार कोणत्याही गोष्टीकडे एकाच दृष्टिकोनातून पाहणे योग्य नाही. प्रत्येक गोष्टीचे अनेक पैलू असतात आणि प्रत्येक व्यक्तीचा दृष्टिकोन वेगळा असू शकतो. त्यामुळे सहिष्णुता आणि संवाद यांना महत्त्व दिले पाहिजे. आजच्या समाजात वाढत्या मतभेदांच्या पार्श्वभूमीवर हा विचार अत्यंत उपयुक्त ठरतो.

महावीरांचे तत्त्वज्ञान केवळ धार्मिक नाही, तर सामाजिक सुधारणांसाठीही प्रेरणादायी आहे. त्यांनी जातिभेद, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांचा विरोध केला. त्यांनी सर्वांना समानतेचा आणि बंधुत्वाचा संदेश दिला. त्यांच्या मते, प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या कर्मांद्वारे उन्नती साधू शकते. हा विचार त्या काळात अत्यंत क्रांतिकारक होता.

महावीर जयंती हा दिवस या सर्व विचारांचे स्मरण करून देणारा आहे. या दिवशी जैन समाजात विविध धार्मिक कार्यक्रम, पूजा, प्रवचने आणि मिरवणुका आयोजित केल्या जातात. मंदिरांमध्ये विशेष सजावट केली जाते आणि महावीरांच्या मूर्तीची पूजा केली जाते. अनेक ठिकाणी दानधर्म आणि सामाजिक सेवा उपक्रम राबवले जातात. परंतु या उत्सवाचा खरा अर्थ केवळ या विधींमध्ये नसून त्यांच्या तत्त्वांचे आचरण करण्यात आहे.

आजच्या आधुनिक युगात, जिथे तंत्रज्ञानाची प्रगती होत आहे, परंतु मानवी मूल्ये कमी होत चालली आहेत, तिथे महावीरांचे विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. त्यांच्या शिकवणुकीमुळे आपण आपल्या जीवनात संतुलन साधू शकतो. अहिंसा, सत्य आणि संयम या मूल्यांचा अवलंब केल्यास समाजात शांतता आणि समन्वय निर्माण होऊ शकतो.

महावीरांच्या शिकवणुकीचा प्रभाव केवळ त्यांच्या काळापुरता मर्यादित राहिला नाही, तर पुढील अनेक शतकांपर्यंत समाजाच्या विविध स्तरांवर त्याचा परिणाम दिसून आला. भगवान महावीर यांनी दिलेला अहिंसेचा संदेश पुढे अनेक सामाजिक आणि राजकीय चळवळींचा आधार बनला. अहिंसा ही केवळ वैयक्तिक सद्गुण नसून ती समाजव्यवस्थेचा पाया ठरू शकते, हा विचार त्यांनी प्रत्यक्ष आचरणातून सिद्ध करून दाखवला. त्यांच्या या विचारांचा प्रभाव पुढील अनेक महान व्यक्तिमत्त्वांवरही पडला आणि त्यांनीही अहिंसेचा मार्ग स्वीकारून समाजपरिवर्तनाचे कार्य केले.

महावीरांनी मानवी जीवनाला केवळ बाह्य यशाच्या चौकटीत न मोजता, अंतर्मनाच्या शुद्धतेवर भर दिला. त्यांच्या मते, खरे सुख हे बाह्य संपत्ती, सत्ता किंवा प्रतिष्ठेमध्ये नसून आत्मिक समाधानात आहे. त्यामुळे त्यांनी आत्मसंयम, त्याग आणि साधेपणा यांना विशेष महत्त्व दिले. आजच्या काळात, जिथे माणूस अधिकाधिक भौतिक सुखांच्या मागे धावत आहे, तिथे महावीरांचे हे तत्त्वज्ञान आपल्याला थांबून विचार करण्यास भाग पाडते.

महावीरांच्या तत्त्वज्ञानातील अपरिग्रह हा विचार आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाचा ठरतो. अनावश्यक वस्तूंचा संचय, संसाधनांचा अतिरेक वापर आणि उपभोगवादी जीवनशैली यामुळे पर्यावरणावर मोठा ताण येत आहे. जर मानवाने अपरिग्रहाचा मार्ग स्वीकारला, तर नैसर्गिक संसाधनांचे जतन होईल आणि पर्यावरणीय संतुलन राखले जाईल. त्यामुळे महावीरांचे तत्त्वज्ञान केवळ आध्यात्मिक नाही, तर पर्यावरणपूरकही आहे.

त्याचप्रमाणे, अनेकांतवाद हा महावीरांनी दिलेला अत्यंत आधुनिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन आहे. या तत्त्वानुसार, कोणत्याही विषयाकडे एकाच दृष्टिकोनातून पाहणे चुकीचे आहे. प्रत्येक गोष्टीचे अनेक पैलू असतात आणि प्रत्येक व्यक्तीचा दृष्टिकोन वेगळा असू शकतो. त्यामुळे संवाद, सहिष्णुता आणि परस्पर आदर यांना महत्त्व दिले पाहिजे. आजच्या काळात, जिथे मतभेदांमुळे संघर्ष निर्माण होतात, तिथे अनेकांतवाद हा विचार समाजाला एकत्र ठेवण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतो.

महावीरांनी स्त्री-पुरुष समानतेचाही संदेश दिला. त्यांनी स्त्रियांनाही आध्यात्मिक प्रगतीची संधी दिली. त्या काळात, जेव्हा स्त्रियांना अनेक सामाजिक बंधनांमध्ये अडकवले गेले होते, तेव्हा महावीरांचा हा विचार अत्यंत प्रगत आणि क्रांतिकारक होता. त्यामुळे त्यांचे तत्त्वज्ञान केवळ धार्मिक नाही, तर सामाजिक न्यायाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहे.

महावीर जयंती साजरी करताना या सर्व विचारांचे स्मरण करणे अत्यंत आवश्यक आहे. या दिवशी जैन समाजात विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. मंदिरांमध्ये विशेष पूजा, अभिषेक आणि प्रवचने होतात. अनेक ठिकाणी मिरवणुका काढल्या जातात. तसेच, दानधर्म, अन्नदान आणि गरजूंना मदत करण्याचे उपक्रम राबवले जातात. परंतु या उत्सवाचा खरा अर्थ केवळ या बाह्य विधींमध्ये नसून त्यांच्या तत्त्वांचे आचरण करण्यात आहे.

आजच्या आधुनिक युगात, जिथे जीवन अधिक वेगवान आणि स्पर्धात्मक झाले आहे, तिथे माणसामध्ये तणाव, असुरक्षितता आणि असंतोष वाढताना दिसतो. अशा परिस्थितीत महावीरांचे तत्त्वज्ञान आपल्याला मानसिक शांती आणि स्थैर्य मिळवण्याचा मार्ग दाखवते. ध्यान, संयम आणि आत्मपरीक्षण यांचा अवलंब केल्यास आपण आपल्या जीवनात संतुलन साधू शकतो.

महावीरांचे जीवन आपल्याला हे शिकवते की खरे महानत्व हे बाह्य यशामध्ये नसून आपल्या विचारांमध्ये आणि आचरणामध्ये असते. त्यांनी अत्यंत साधे आणि संयमी जीवन जगले, परंतु त्यांच्या विचारांची उंची अत्यंत महान होती. त्यांच्या जीवनातील प्रत्येक कृती ही मानवतेच्या कल्याणासाठी होती. त्यामुळेच त्यांचे तत्त्वज्ञान आजही तितकेच प्रेरणादायी आणि उपयुक्त आहे.

महावीर जयंती हा दिवस आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची संधी देतो. आपण आपल्या जीवनात कितपत अहिंसा, सत्य, अपरिग्रह आणि संयम या मूल्यांचा अवलंब करतो, याचा विचार करण्याची ही वेळ आहे. जर आपण या तत्त्वांचा अंगीकार केला, तर आपण केवळ स्वतःचे जीवन सुधारू शकतो असे नाही, तर समाजातही सकारात्मक बदल घडवू शकतो.

आजच्या काळात, जिथे हिंसा, द्वेष, भ्रष्टाचार आणि असहिष्णुता वाढत आहे, तिथे महावीरांचे विचार आपल्याला योग्य दिशा दाखवतात. त्यांच्या शिकवणुकीमुळे आपण शांततेचा, समतेचा आणि नैतिकतेचा मार्ग स्वीकारू शकतो. जर प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनात थोड्याफार प्रमाणातही या तत्त्वांचा अवलंब केला, तर समाजात मोठा सकारात्मक बदल घडू शकतो.

शिक्षणक्षेत्रातही महावीरांचे तत्त्वज्ञान अत्यंत उपयुक्त आहे. विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांच्या विचारांचा समावेश शिक्षणात केला पाहिजे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये केवळ बौद्धिक विकासच नव्हे, तर नैतिक आणि सामाजिक विकासही होईल.

महावीरांचे तत्त्वज्ञान हे केवळ एका धर्मापुरते मर्यादित नाही. ते संपूर्ण मानवजातीसाठी मार्गदर्शक आहे. त्यांच्या विचारांमध्ये सार्वत्रिकता आहे. कोणत्याही धर्म, जाती किंवा संस्कृतीतील व्यक्तीने त्यांच्या तत्त्वांचा अवलंब केल्यास त्याचे जीवन अधिक शांत, संतुलित आणि समाधानकारक होऊ शकते. शेवटी असे म्हणता येईल की महावीर जयंती हा केवळ एक धार्मिक उत्सव नसून तो मानवतेचा उत्सव आहे. हा दिवस आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची, आपल्या जीवनातील त्रुटी सुधारण्याची आणि एक चांगले माणूस बनण्याची प्रेरणा देतो. भगवान महावीर यांचे तत्त्वज्ञान हे आजही तितकेच जिवंत आणि उपयुक्त आहे. त्यांच्या विचारांचा अवलंब करून आपण एक शांत, समतामूलक आणि नैतिक समाज निर्माण करू शकतो. त्यामुळे महावीर जयंती साजरी करताना त्यांच्या शिकवणुकीचा अंगीकार करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

-डॉ. राजेंद्र बगाटे
हिंगोली
मो.९९६०१०३५८२

# भारताच्या पहिल्या महिला डॉक्टर : आनंदीबाई जोशी



३१ मार्च १८६५ मध्ये आनंदीबाई यांचा जन्म कल्याण येथे झाला. वडिलांचे नाव गणपत अमृतेश्वर जोशी होते. मुलगी म्हणून त्यांची खुप हेळसांड झाली. त्या काळाच्या रितीरिवाजाप्रमाणे त्यांचे लग्न वयाच्या नवव्यावर्षी त्यांच्यापेक्षा वयाने वीस वर्ष मोठ्या असलेल्या गोपाळराव यांच्याशी झाले.गोपाळरावांनी आनंदीबाईंना मराठी, इंग्रजी आणि संस्कृतचे शिक्षण दिले. आनंदीच्या आईवडिलांनी तिच्या शिक्षणामध्ये हस्तक्षेप करू नये, म्हणून गोपाळरावांनी आपली बदली कोलकत्त्याला करून घेतली. गोपाळराव आनंदीच्या शिक्षणासाठी नेहमी आग्रही असायचे. गोपाळराव स्वतः लोकहितवादी ची शतपत्रे वाचत. आपल्या पत्नीला शिक्षणात रस आहे हे गोपाळरावांनी जाणले होते.

संसारवेलीवर एक फुल देखील उमलले पण त्या बाळाने या जगाचा लवकरच निरोप घेतला. याचा आघात आनंदीबाई यांच्या मनावर झाला. या काळात गोपाळरावांनी त्यांना आधार दिला. समाजामध्ये महिला डॉक्टरची किती आवश्यक्ता आहे याची जाणीव आनंदीबाईला झाली आणि आपणही डॉक्टर व्हावे अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली.आणि त्यांच्या इच्छेला वास्तवात उतरण्यासाठी गोपाळरावांनी खुप कष्ट घेतले.ते आधुनिक विचारसरणीचे होते.स्त्रीयांच्या बाबतीत समाजाचे बुरसटलेले विचार त्यांना कदापी मान्य नव्हते म्हणूनच पंडीता रमाबाई यांच्याकडून प्रेरणा घेऊन स्वताहा पत्नीच्या शिक्षणाला प्रेरणा दिली.

अमेरिकेला जाण्यापूर्वी श्रीरामपूर (बंगाल) इथल्या बॅप्टिस्ट कॉलेजच्या सभागृहात आनंदीबाई जोशी यांनी 'मी अमेरिकेस का जाते?' यावर इंग्रजीत भाषण केल.त्यातला एक महत्वाचा मुद्दा असा की, पृथ्वीच्या पाठीवर हिदुस्थानाइतका रानटी देश दुसरा नाही. देशातील लोकांना आपल्या गरजा त्या पूर्ण करून स्वावलंबन करता येत नाहीत. वैद्यकशास्त्रज्ञ स्त्रियांची हिंदुस्थानातल्या प्रत्येक भागात अतिशय जरुरी आहे. सभ्य स्त्रिया पुरुष वैद्याकडून चिकित्सा करून घेण्यास प्रवृत्त नसतात. इथे स्त्री डॉक्टरची किती गरज आहे हे ओळखून आनंदीबाई डॉक्टरची पदवी घेण्यासाठी अमेरिकेत गेल्या.आणि असंख्य संकटांचा सामना करत आनंदीबाई यांनी वयाच्या एकोणविसाव्यावर्षी इ.स.१८८६ मध्ये थेट अमेरिकेमधून डॉक्टरकीची पदवी मिळवली होती.शिक्षण घेताना आनंदीबाईंचे आरोग्य नेहमी बिघडायचे. पण त्यावर त्यांनी मात करत एम.डी.ची पदवी मिळवली. पदवी मिळवल्यानंतर खुद्द राणी विक्टोरिया हिने अभिनंदनाचा संदेश आनंदीबाईंना पाठवला होता. प्राचीन हिंदू स्त्रियांच्या प्रसूतीकरणावर अभ्यास करून आनंदीबाईंनी आपला प्रबंध पूर्ण केला आणि त्या भारतातील पहिल्या महिला डॉक्टर होण्याचा मान त्यांना मिळाला.

१६ नोव्हेंबर १८८६ या दिवशी त्या आपल्या मायभूमीत परत आल्या. तेव्हा मुंबई बंदरावर लोकांनी अफाट गर्दी केली होती.त्यांचं पुष्पवृष्टीनं स्वागत केलं. 'नारायणपेठी काळी चंद्रकळा (नऊवारी), खणाची चोळी, कपाळावर कुंकू, नाकात नथ, कानात कुडी, पायात बूट व स्टॉकिंग्ज' असा थाट होता.त्यांना पाहून गोपाळरावांचा ऊर अभिमानाने भरुन आला. जाताना एकट्या गेलेल्या आनंदीबाई येतांना मात्र गोपाळराव त्यांच्या सोबत होते.बाहेर देशातून येताना त्यांना क्षयरोगाची बाधा झाली, बोटीवरच्या गोऱ्या डॉक्टरांनी तिला बिगर-गौरवर्णीय म्हणून उपचार केले नाही.आणि आपल्या मायभुमित सातसमूद्र पार करुन आली म्हणून हिंदू डॉक्टरांनी उपचारास नकार दिला, त्यामुळे त्यांचे शरीर थकले.आणि वयाच्या वीसाव्या वर्षी आनंदीबाई जोशी यांचे २६ फेब्रुवारी १८८७ रोजी निधन झाले. अमेरिकेत कार्पेटर कुटुंबियांनी आपल्या कुटुंबाच्या स्मशानात त्यांचे लहानसे थडगे बांधले. त्यावर 'आनंदी जोशी, एक तरुण हिंदू ब्राह्मणकन्या. परदेशात शिक्षण घेऊन डॉक्टर पदवी मिळवणारी पहिली भारतीय स्त्री' अशी अक्षरे कोरून तिचे स्मारक केले.भारतीय समाजाने स्त्रीयांना कायम तुच्छ मानले,तरी काही स्त्रीयांनी आपले कर्तृत्व सिध्द केले. त्यामध्ये आनंदीबाई जोशी या देखील आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव करत दूरदर्शनने आनंदीबाई यांच्या जीवनावर आधारित 'आनंदी गोपाळ' नावाची हिंदी मालिका देखील प्रदर्शित केली होती. त्याकाळात ती खुप गाजली. खरे तर आपल्या आयुष्याची आहुती देऊन आनंदीबाईने पुढच्या पिढीतल्या स्त्रियांना शिका आणि वैचारिकदृष्टया सक्षम व्हा, असा संदेश त्यांनी दिला.आज त्यांची जयंती त्यानिमित्त त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन.

-रुपाली वागरे/वैद्य
नांदेड
मो. ९८६०२७६२४१

# ट्रॅजेडी क्वीन मीना कुमारी



हिंदी चित्रपट सृष्टीतील ट्रॅजेडी क्वीन मीना कुमारी यांचा आज स्मृतिदिन. मीना कुमारी यांचा जन्म १ ऑगस्ट १९३२ रोजी एका सुन्नी मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे मूळ नाव मेहजबिन असे होते. कलेचा वारसा त्यांना कुटुंबातूनच मिळाला. त्यांचे वडील अली बक्ष हे चित्रपट आणि पारशी रंगभूमीवरील कलाकार होते. आई इकबाल बानू या प्रसिद्ध नृत्यांगना होत्या. कामिनी या नावाने त्या अभिनयही करत. मीना कुमारी या चार वर्षाच्या असतानाच त्यांनी अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवले. लेदर फेस नावाच्या चित्रपटात त्यांनी बाल कलाकार म्हणून काम केले. त्यांनी जवळपास २० चित्रपटात बाल कलाकार म्हणून काम केले. वयाच्या १४ व्या वर्षी बच्चो का खेल या चित्रपटात त्यांनी नायिका म्हणून भूमिका केली. त्या काळात नर्गिस, नूतन, निम्मी या आघाडीच्या अभिनेत्री चित्रपट सृष्टीवर अधिराज्य गाजवत होत्या.

मीना कुमारी यांनीही दमदार अभिनयाद्वारे त्यांच्यात स्थान मिळवले आणि लवकरच त्याही आघाडीच्या अभिनेत्री बनल्या. कमाल अमरोही दिग्दर्शित महल हा त्यांचा चित्रपट खूप गाजला. पुढे कमाल अमारोही यांनी मीना कुमारी यांना घेऊन अनारकली नावाचा चित्रपट बनवण्याची घोषणा केली . या चित्रपटाचे शूटिंग सुरू असतानाच मीना कुमारी यांना अपघात झाला त्यात त्यांच्या डाव्या हाताला दुखापत झाली. यावेळी कमाल अमारोही त्यांना नियमित भेटायला येत त्यातूनच त्यांचे प्रेम जमले. आर्थिक अडचणीमुळे हा चित्रपट पूर्ण होऊ शकला नाही मात्र दोघांमधील प्रेम वाढत गेले. कमाल अमारोही मीना कुमारी यांना मंजू म्हणत तर मीना कुमारी कमाल अमारोही यांना चंदन नावाने संबोधत असे. दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला तरी घरच्यांच्या संमती शिवाय लग्न करण्यास मीना कुमारी तयार नव्हत्या. मात्र कमाल अमारोही यांनी खुप आग्रह केल्याने त्यांनी लग्न केले. त्यांच्या लग्नाची बातमी त्यांच्या वडिलांना समजल्यावर ते खूप संतापले. त्यांनी दोघांच्या भेटीवर बंधने आणली

कमाल अमारोही यांनी मीना कुमारी यांना घेऊन डेरा नावाचा चित्रपट काढण्याची घोषणा केल्यावर वडील अली बक्ष यांनी मेहबूब यांच्या अमर नावाच्या चित्रपटात काम करण्यासाठी मीना कुमारी यांच्यावर दबाव आणला. चार पाच दिवसांचे शूटिंग झाल्यावर त्यांनी तो चित्रपट सोडला व थेट आपल्या नवऱ्याकडे म्हणजे कमाल अमारोही यांच्याकडे गेल्या. कमाल अमारोही यांचे पहिले लग्न झाले होते व त्यांना पहिल्या पत्नीपासून तीन अपत्येही होते. त्यामुळे मीना कुणारी यांची तीव्र इच्छा असतानाही मीना कुमारी यांना मूल होऊ न देण्याचा निर्णय त्यांच्याकडून तिच्यावर लादला गेला. मीना कुमारी यांच्या कौटुंबिक जीवनात इतकी उलथापालथ होत असताना त्यांचे चित्रपट मात्र यशस्वी होत होते. एक ही रास्ता, दिल अपना प्रीत पराई, दायरा, परिणिता, दिल एक मंदिर, शारदा, साहब बीबी और गुलाम, फुल और पथर हे त्यांनी अभिनय केलेले उल्लेखनीय चित्रपट.

मीना कुमारी या फिल्म फेअर पुरस्कार मिळवलेल्या पहिल्या अभिनेत्री आहेत . १९५३ साली त्यांना बैजू बावरा साठी तर पुढील वर्षी म्हणजे १९५४ साली परिणितासाठी देखील फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. साहब बीबी और गुलाम तसेच काजल या चित्रपटातील भूमिकांसाठीही त्यांना फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला आहे. मीना कुमारी या जितक्या चांगल्या अभिनेत्री होत्या तितक्याच चांगल्या कवियत्री देखील होत्या. नाझ या नावाने त्यांच्या काही उर्दू रचना प्रकाशित झाल्या आहेत. त्यांचा आवाजही गोड होत्या. मधुबाला यांना त्यांचा आवाज खुप आवडायचा. त्यांच्या यशाचा आलेख जसा उंचावत गेला तसा कमाल अमरोही यांचा हेवा वाढत गेला. मीना कुमारी यांनी अभिनय सोडून द्यावा यासाठी ते दबाव आणू लागले. मीना कुमारी यांनी अभिनय सोडण्यास नकार दिल्याने दोघांतील तणाव वाढत गेला. पुढे दोघे विभक्त झाले. त्यानंतर धर्मेंद्र यांच्याशी त्यांचे संबंध असल्याचीही चर्चा होती. ते दोघेही एकमेकांच्या प्रेमात बुडाल्याचे अनेक दाखले जुन्या चित्रपट मॅगझीन मधून मिळतात. फुल और पथर या चित्रपटानंतर धर्मेंद्र यांनीही त्यांच्यापासून अंतर ठेवण्यास सुरवात केल्यावर त्या व्यथित झाल्या. त्यांची प्रकृती खालावली.

डॉक्टरांनी त्यांना रोज एक पेग ब्रांडी घेण्याची सूचना केली. पण एक पेगचे दोन पेग, दोनचे चार पेग असे पेग वाढत गेले. औषध म्हणून सुरू केलेली ब्रांडी लवकरच व्यसनात रूपांतरित झाली. त्या नशेच्या आहारी गेल्या. शूटिंगच्यावेळी, प्रवासात त्यांच्या पर्स मध्ये ब्रांडीची बाटली असायची. साहब बीबी और गुलाम तसेच छोटी बहू या चित्रपटातील भुमीका आपल्या वास्तव जीवनाशी साधर्म्य दाखवणाऱ्या आहेत असे त्या म्हणत. नशेच्या आहारी गेल्याने त्यांची प्रकृती खालावत गेली त्यातच त्यांचे निधन झाले. पडद्यावरील आणि वास्तव जीवनातील साधर्म्य असणाऱ्या ट्रॅजेडी क्वीन ३१ मार्च १९७२ रोजी काळाच्या पडद्याआड गेल्या. ट्रॅजेडी क्वीन मीना कुमारी यांना भावपूर्ण आदरांजली.

-श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# स्मार्ट सिटीसाठी पाणी, स्वच्छता आणि डिजिटल सेवेवर भर -खा. चव्हाण

## कौठा येथे २४ तास पाणी पुरवठा तर स्वच्छता ताफ्यात नवीन वाहने दाखल



**नांदेड (प्रतिनिधी)** -शहराच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी आणि नागरिकांना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सोमवारी महानगरपालिकेच्या विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला. महानगरपालिकेत भारतीय जनता पार्टी- शिवसेना महायुतीची सत्ता आल्यानंतर महापौरांनी १०० दिवसांचा कृती आराखडा प्रसिद्ध केला होता. त्या आराखड्याची पहिली वचनपुर्ती सोमवार, दि. ३० मार्च रोजी करण्यात आली. राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते या विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला. नांदेडला स्मार्ट सिटीच्या दिशेने नेण्यासाठी पाणी, स्वच्छता आणि डिजिटल सेवा या त्रिसूत्रीवर आम्ही भर देत आहोत, असे खासदार अशोकराव चव्हाण यांनी यावेळी जाहीर केले.

खा. अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते कौठा भागातील रविनगर येथे २४७ पाणी पुरवठा योजनेचा प्रायोगिक तत्त्वावर (Pilot Project) शुभारंभ करण्यात आला. या योजनेमुळे आता या परिसरातील नागरिकांना चोवीस तास आणि पुरेशा दाबाने पाणी उपलब्ध होणार आहे. शहरातील प्रत्येक घराला शुद्ध आणि निरंतर पाणी मिळावे, हे आमचे उद्दिष्ट आहे, असे प्रतिपादन यावेळी चव्हाण यांनी केले.

केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० योजने अंतर्गत या योजनेचे काम हाती घेण्यात आले असून, कौठा भागात २ कि. मी. जलवाहिनी नव्याने टाकून एकूण १४१४ मालमत्ताधारकांना Ultraasonic Water MR Meter बसवून २४७ पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. या यशस्वी प्रयोगानंतर ही योजना टप्प्याटप्प्याने संपूर्ण शहरात राबवली जाणार आहे.

तसेच शहराच्या स्वच्छतेसाठी महानगरपालिका मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात खासदार चव्हाण यांच्या हस्ते नवीन अत्याधुनिक स्वच्छता वाहनांचे लोकार्पण करण्यात आले. स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० अंतर्गत शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी महानगरपालिकेच्या ताफ्यात नवीन अत्याधुनिक स्वच्छता वाहने समाविष्ट करण्यात आली आहेत. यामध्ये स्वच्छता विभागासाठी दोन स्विपींग मशीन व मलनिस्सारण विभागासाठी एका वाहनाचा समावेश असून, त्यात जेटींग, गल्फर व रिसायक्लींगचा समावेश असणार आहे. या अत्याधुनिक मशीनचा व्हॅक्यूम क्लीनरव्दारे मुख्य रस्त्यावरील स्वच्छता जलद गतीने होण्यास मदत होईल. त्याचप्रमाणे जेटींग कम सक्शन मशीन वाहनामुळे मॅन होल व ड्रेनेज लाईनची स्वच्छता तातडीने होण्यास मदत होणार आहे.

त्याचप्रमाणे प्रशासनात पारदर्शकता आणि वेग आणण्यासाठी 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम' (RTS) अंतर्गत महापालिकेच्या ७४ सेवा आता पूर्णपणे ऑनलाईन करण्यात आल्या आहेत. या सेवांच्या संनियंत्रणासाठी तयार करण्यात आलेल्या 'अविरत कक्षा' चे उद्‌घाटनही खा. चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. आता नागरिकांना पालिकेत न येता घरबसल्या विविध दाखले आणि परवाने मिळवता येणार आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शिका पालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून, नागरिकांसाठी नाविण्यपूर्ण Whatsapp Chatboat व्दारे भ्र.क्र.७८८८२८०००० या क्रमांकावर सेवा देण्यात येणार आहे. भविष्यात शासनाच्या विविध विभागांच्या अधिसूचित सेवा सुध्दा महापलिकेच्या अविरत केंद्रातून देण्याचे नियोजन असल्याचे यावेळी पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी सांगितले.

हा प्रकल्प केवळ नळातून पाणी येण्यापुरता मर्यादित नाही, तर तो नांदेडकरांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावणारा एक क्रांतिकारी टप्पा आहे. या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी महानगरपालिकेने अद्ययावत तंत्रज्ञान आणि नवीन जलवाहिन्यांचे जाळे विस्तारले आहे. आज या महत्वाकांक्षी योजनेचा शुभारंभ होताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. आपण सर्वजण या बदलाचे साक्षीदार आहोत. या योजनेचा लाभ घेताना आपण सर्वांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन यावेळी पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी केले.

या सोहळ्या प्रसंगी खासदार अशोकराव चव्हाण यांच्यासह महापौर कविता मुळे, भाजपा महानगरध्यक्ष अमरनाथ राजूरकर, उपमहापौर दीपकसिंग रावत, सभागृह नेते ॲड. महेश कनकदंडे, स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, महिला व बालकल्याण सभापती सदिच्छा सोनी पाटील, उपसभापती निरंजना लांडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच नगरसेवक अभिषेक सौदे, दीपाली मोरे, सुलोचना काकडे, अनुराधा काळे, संजय घोगरे, सुवर्णा बस्वदे, वैजनाथ देशमुख, मंगला देशमुख, साहेबराव गायकवाड, स्वीकृत सदस्य दिलीप कंदकुर्ते, अमित तेहरा, डॉ. अंकुश देवरकर यांच्यासह अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, उपायुक्त अभिजित वायकोस, अजितपालसिंघ संधु, नितीन गाढवे, शहर अभियंता सुमंत पाटील, कार्यकारी अभियंता संघरत्न सोनसळे, दिलीप टाकळीकर, सहाय्यक आयुक्त मो.गुलाम सादेक, सिस्टिम मॅनेजर सदाशिव पतंगे, उपअभियंता प्रकाश कांबळे, जनसंपर्क अधिकारी सुमेध बनसोडे व विविध विभागांचे अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अर्धापुरात म. ज्योतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या चबुतऱ्याचे भूमिपूजन



**अर्धापूर (प्रतिनिधी)**– येथील प्रज्ञा बौद्ध विहारात महात्मा ज्योतीबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे चबुतऱ्याचे भूमिपूजन सोमवार, दि. ३० मार्च रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले.

अर्धापूर शहरातील प्रज्ञा बौद्ध विहारात क्रांतीसूर्य म. ज्योतीबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासाठी खा. अशोकराव चव्हाण व आ. श्रीजया चव्हाण यांनी ६० लाख रुपये निधी मंजूर केला आहे. पुतळ्याच्या चबुतरांच्या कामाचे भूमिपूजन नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, उपनगराध्यक्ष मुक्तेदरखान पठाण, माजी उपनगराध्यक्ष राजेश्वर शेटे, नगरसेवक सोनाजी सरोदे, मुख्याधिकारी जगदीश दळवी, गटनेते बाबुराव लंगडे, नगरसेवक प्रतिनिधी प्रल्हादराव माटे, माजी उपसरपंच भुजंगराव माटे, पं.स.म.त.नि.स. अध्यक्षा शितल कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांचा सत्कार जयंती मंडळाचे अध्यक्ष उमाकांत सरोदे यांच्या वतीने करण्यात आला.

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष ओमप्रकाश पत्रे, नगरसेवक नामदेव सरोदे, व्यंकटी राऊत, बबनराव लोखंडे, केशव कोल्हे, पत्रकार राजू देशमुख, वैभव माटे, शुभम लुटे, भीमराव सरोदे, महेंद्र सरोदे, गोपाल पंडित, वानखेडे, अक्षय कांबळे, अभियंता छगन सोनटक्के, मेनकुदळे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जफरनामा विषयावरील प्रेरणादायी व्याख्यान संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील श्री गुरु गोबिंदसिंघजी अध्यासन संकुल आणि संशोधन केंद्राच्या वतीने 'जफरनामा' या महत्त्वपूर्ण विषयावर शनिवार, दि.२८ मार्च रोजी विद्यापीठातील अधिसभा सभागृहात व्याख्यान पार पडले.

या व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते म्हणून मंठळकर तसेच श्रीमती अनिलकौर रामगडिया उपस्थित होते. त्यांनी 'जफरनामा' या विषयावर सखोल मार्गदर्शन करताना श्री गुरु गोबिंदसिंघजी यांच्या जीवनातील आदर्श, सत्यनिष्ठा, धैर्य आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा यावर विशेष प्रकाश टाकला. समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रत्येकाने या मूल्यांचा स्वीकार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

'जफरनामा' हे श्री गुरु गोबिंदसिंघजी यांनी औरंगजेबाला लिहिलेले ऐतिहासिक पत्र असून, त्यामध्ये सत्य, न्याय आणि धर्मनिष्ठेचा प्रभावी संदेश दिलेला आहे. अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहण्याचा बोध या पत्रातून मिळतो, असेही वक्त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास विद्यापीठातील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी श्री गुरु गोबिंदसिंघजी अध्यासन संकुल आणि संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश निहालानी तसेच विद्यापीठाचे कर्मचारी विष्णू भुसारे, सुरेश देशमुख, साहेबराव लुटे, संकेत साखरे, अजय इंगोले, शिल्पा धनमने आदींची उपस्थिती होती.

# खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– माहे फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांचे क्रीडा सवलतीचे प्रस्ताव आपले सरकार या पोर्टलवर URL: https://aaplesarkar.mahaonline.gov.in या लिंकव्दारे सादर करण्यास उपलब्ध करून दिले असल्याचे सचिव, राज्य मंडळ, पुणे यांचेमार्फत कळविले आहे.

फेब्रुवारी-मार्च २०२६ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षांचे निकाल मागील वर्षीप्रमाणे लवकर जाहीर करण्याच्या दृष्टीने क्रीडा सवलतीचे प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडून विभागीय मंडळाकडे आपले सरकार या पोर्टलव्दारे ऑनलाईन पध्दतीने User Manual मध्ये नमूद केल्याप्रमाणे ऑनलाईन प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन दिनांक १५ एप्रिल,२०२६ पर्यंत स्वीकारण्याबाबत कळविण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने नांदेड जिल्ह्यातील विद्यार्थी/ शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय यांनी क्रीडा गुण सवलतीचे प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,नांदेड यांचेकडे ऑनलाईन पध्दतीने अर्ज/प्रस्ताव सादर करण्यासाठी ऑनलाईन प्रणाली उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यानुसार आपले सरकार या पोर्टलवर URL: https://aaplesarkar.mahaonline.gov.in या लिंकव्दारे विद्यार्थी/शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज पाठवावयाचे आहेत.

# बारडच्या शीतलादेवी मंदिरात यात्रा महोत्सव, हनुमान मूर्तीची पालखी मिरवणूक

## कुस्त्यांचा फड रंगणार

**मुदखेड (प्रतिनिधी)**– येथील तेलंगणा, आंध्र प्रदेश, मराठवाडा, विदर्भातील जागृत देवस्थान तसेच भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या शीतलादेवी (पोचम्मा) देवीच्या यात्रा महोत्सवास उत्साहात सुरुवात झाली आहे. यानिमित्त हनुमान मूर्ती पालखी मिरवणूक ग्रामस्थांच्या वतीने काढण्यात येणार असून, कुस्त्यांचा फडही रंगणार आहे.

पोचम्मा देवीचे पुरातन काळातील वडाच्या झाडाखाली वसलेले मंदिर आहे. शीतला मातेचे वास्तव्य विहिरीत असल्याचे सांगितले जाते. थोर स्वातंत्र्य सेनानी साहेबराव देशमुख बारडकर यांनी देवस्थानासाठी चार गुंठे जागा दान दिली आहे. चैत्र वैशाख पौर्णिमेला दरवर्षी यात्रा भरत असते. यानिमित्त लाखो भक्त चंद्रपूरच्या देवीचे दर्शन घेऊन शीतला देवीचे दर्शन घेण्याची प्रथा रूढ आहे. चंद्रपूरच्या आईची धाकटी बहीण म्हणून पोचम्मा देवीची ओळख आहे. भक्तांचे श्रद्धास्थान असल्याने तेलंगणा, आंध्र प्रदेश, विदर्भ, मराठवाड्यासह जिल्ह्यातील भक्त नवसाची परतफेड करण्यासाठी मनोभावी आराधना करतात. नवरात्र महोत्सवात ओटी भरण्यासाठी सुहासिनीची लगबग असते. नवरात्र अष्टमीला तांबोल व दुधाचा प्रसाद वाटप केला जातो. संस्थांच्या वतीने दरवर्षी पाडव्यानिमित्त शीतलादेवीची बैलगाडीतून आंबील काढण्याची पद्धत आहे.

ग्रामस्थांच्यावतीने दरवर्षी हनुमान जयंतीला यात्रा महोत्सव निमित्त पालखी मिरवणूक काढली जाते. शंभर वर्षांपूर्वीची सुंदर आकर्षक लाकडी नागोबा कुंभार यांनी तयार केलेल्या मूर्तीची गावातील प्रमुख रस्त्यावरुन भक्तीमय वातावरणात शोभायात्रा काढण्यात येते. गुरुवार, दि. २ एप्रिल रोजी सायंकाळी शोभायात्रा निघणार आहे. या महोत्सवाला पंचक्रोशीतील नागरिकांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# दिव्यांगांसाठी राखीव ५ टक्के निधी तत्काळ वितरित करण्याची मागणी

**किनवट (प्रतिनिधी)** -किनवट नगर परिषद व पंचायत समिती अंतर्गत दिव्यांग व्यक्तींसाठी राखीव ठेवण्यात आलेला ५ टक्के निधी आर्थिक वर्ष २०२५-२६ संपण्यापूर्वी तत्काळ वितरित करावा, अशी मागणी सेक्युलर दिव्यांग मुव्हमेंटच्यावतीने करण्यात आली आहे.

या संदर्भात संस्थेचे अध्यक्ष ॲड. मिलिंद सर्पे व सचिव दिलीप पाटील यांनी नगर परिषदच्या नगराध्यक्षा तसेच पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना सोमवार, दि. ३० मार्च रोजी निवेदन दिले आहे. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या एकूण वार्षिक निधीपैकी किमान ५ टक्के निधी दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. या निधीतून विविध योजनांची अंमलबजावणी करून दिव्यांग नागरिकांना आर्थिक व सामाजिक आधार देणे अपेक्षित आहे. मात्र, किनवट नगर परिषद व पंचायत समिती कार्यक्षेत्रातील अनेक पात्र दिव्यांग नागरिकांना अद्याप या निधीचा लाभ मिळालेला नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# के. आर. एम. महिला महाविद्यालयात साहित्य आणि भाषा विषयावर व्याख्यान संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)** -येथील के. आर. एम. महिला महाविद्यालय तसेच इंग्रजी विभाग, प्रतिभा निकेतन महाविद्यालय नांदेड सामंजस्य करार अंतर्गत साहित्य आणि भाषा या विषयावर प्रा. डॉ. स्वाती तांडे यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान नुकतेच पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. विजया देशमुख होत्या.



या व्याख्यानात प्रा. डॉ. स्वाती तांडे यांनी साहित्य आणि भाषा यांचा घनिष्ठ संबंध स्पष्ट करत साहित्यामुळे भाषा समृद्ध होते आणि भाषेमुळे साहित्य अधिक सखोलपणे समजते, असे प्रतिपादन केले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्या डॉ. विजया देशमुख यांनी भाषा आणि साहित्य एकमेकांना पुरक असून साहित्यातून समाजाचे वास्तव दर्शन होते. तसेच साहित्य समाजाला दिशा व मार्गदर्शन करते, असे विचार मांडले. या व्याख्याना दरम्यान बी. ए. प्रथम वर्षात इंग्रजी विषयात पास असणाऱ्या विद्यार्थिनींना इंग्रजी विभागाच्या वतीने प्राचार्या डॉ. विजया देशमुख यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्याचे बक्षीस म्हणून भेट देण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मेघराज पवार यांनी केले, तर प्रा. डॉ. भगवान गुंजलवाड यांनी आभार मानले. कार्यक्रमास विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# जलसंपदा विभागामार्फत केदारनाथ साठवण तलावावरील चाऱ्या, कालव्याची दुरुस्ती, सिमेंट कॉंक्रिटीकरण करा

## जलसंपदामंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे भागवत देवसरकर यांची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– जलसंपदा विभागामार्फत हदगाव तालुक्यातील केदारनाथ साठवण तलावावरील सर्व कालवे, चाऱ्या दुरुस्ती करून सिमेंट काँक्रिटकरण करण्यासाठी संबंधित विभागाकडून सविस्तर प्रस्ताव मागून प्रशासकीय मान्यता देत, निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी राज्याचे जलसंपदामंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे भाजपचे हदगाव तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांनी केली आहे.



केदारनाथ येथे मध्यम प्रकारातील साठवण तलाव आहेत, तलावाच्या माध्यमातून तळेगाव, डोरली, वडगाव, पाथरड, कोळगाव व कंजारा या गावात शेतकऱ्यांना रब्बी हंगामाकरता सिंचनासाठी पाणी मिळत असते, परंतु मागील २५ वर्षापासून कालव्याची कामे न झाल्यामुळे व सर्व कालवे माती कामाचीच असल्यामुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होऊन शेतकऱ्यांना पिकाच्या सिंचनासाठी अपुरे पाणी मिळत आहे, शेवटच्या गावात शेतकऱ्यांना आपल्या पिकासाठी पाणी मिळण्यास मोठ्या प्रमाणावर अडचणी येत आहेत, त्यामुळे नांदेड येथील जलसंपदा विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ आदेश देऊन केदारनाथ तलावावरील कालव्याच्या दुरुस्ती व सिमेंट कॉंक्रिटीकरणकरिता विशेष निधी उपलब्ध करण्यासाठी सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश द्यावेत व सदर कामांकरिता निधी व प्रशासकीय मान्यता द्यावी, अशी मागणी देवसरकर यांनी केली असता तात्काळ दखल घेत निवेदनावर शेरा मारत कार्यकारी संचालक,गोदावरी खोरे विकास महामंडळ छत्रपती संभाजीनगर यांना तपासून प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

# हरबळ येथील वैभवची कुणबी मराठा प्रवर्गातून पोलीस दलात निवड; गावकऱ्यांकडून सत्कार



**लोहा (प्रतिनिधी)**– लोहा तालुक्यातील हरबळ येथील रहिवाशी वैभव शिंदे यांची मराठा या प्रवर्गातून नांदेडच्या पोलीस दलामध्ये निवड झाली आहे. या निवडीबद्दल गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

आपल्या या यशाचे श्रेय वैभव शिंदे यांनी आई-वडील, आजोबा आणि आप्तेष्टांना दिले आहे. वैभव दिगंबर शिंदे यांनी अत्यंत कठीण परिस्थितीत परिश्रम घेऊन पोलीस दलात पात्र होण्यासाठी यश मिळविले आहे.

माझ्या हरबळ येथील गावकऱ्यांनी माझा सत्कार करून प्रोत्साहित केले आहे. त्यांच्या या सन्मानाची जाणीव ठेवून कुटुंब आणि हरबळ येथील ग्रामस्थांशी प्रामाणिक राहून त्यांचे ऋण फेडण्याचा प्रामाणिक प्रयत्न करील अशी ग्वाहीही त्यांनी सत्काराला उत्तर देताना दिली.

यावेळी हरबळ मठाचे मठाधिपती मोहनगिरी महाराज, माणिकराव गिरमाजी पाटील शिंदे, मनसे तालुकाध्यक्ष संतोष शिंदे, तुकाराम पाटील शिंदे, मारोती पाटील शिंदे, कामाजी शिंदे, आकाश शिंदे, प्रसाद शिंदे, मनोज शिंदे, मारोती कानगुलकर, नागेश शिंदे, ईश्वर शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

# किनवटमध्ये मोफत नेत्र तपासणी शिबिराला प्रतिसाद

**किनवट (प्रतिनिधी)**– भारत जोडो युवा अकादमी संचालित साने गुरुजी इमर्जन्सी व मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, चखऊ, कोठारी ता. किनवट येथे प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या नेत्र रोग तपासणी आणि उपचार शिबिराला रुग्णांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

मोफत नेत्र तपासणी शिबीर दि. २८ मार्च २०२६ रोजी हॉस्पिटलचे संचालक डॉ. अशोक बेलखोडे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आले होते. ग्रामीण भागातील रुग्णांना मोठ्या शहरात जावे लागू नये, या उद्देशाने त्यांच्या संकल्पनेतून या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये आर्णी येथील सुप्रसिद्ध नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. तेजस केशववार यांच्यासह त्यांचे सहयोगी सिद्धेश केशववार, सोनल दासरवार, कोमल बोबडे साने गुरुजी इमर्जन्सी अँड मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलमधील स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. भाग्यश्री बेलखोडे - वरटकर, डॉ. योगेंद्र वरटकर, डॉ. दुर्गा काकडे, डॉ. विद्या गोलकोंडावार, डॉ. शिवानी बेलखोडे यांनीही शिबिरात सहभाग नोंदवला. शिबिरामध्ये मोतीबिंदू, काच बिंदू, डोळ्यातील तिरळेपणा, चष्माचे नंबर आणि शस्त्रक्रिया आदी विषयी गरजू रुग्णांना मार्गदर्शन करण्यात आले.

या शिबिरामध्ये एकूण ५५ रुग्णांची तपासणी केली असता त्यामध्ये २६ रूग्ण शस्त्रक्रियेसाठी पात्र झाले आहेत आणि १३ रुग्णांना चष्म्याचे नंबर काढून देण्यात आले आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेहा गित्ते यांनी केले तर शिबिराचे प्रास्तविक डॉ. विद्या गोलकोंडावार यांनी केले. तसेच उपस्थितांचे आभार अजय जाधव यांनी मानले. नेत्र शिबीर यशस्वी करण्यासाठी साने गुरुजी इमर्जन्सी अँड मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलमधील कर्मचाऱ्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले.

# एन. जी. वाघमोडे यांना राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार प्रदान



**कुंडलवाडी (प्रतिनिधी)**– व्यसनमुक्ती क्षेत्रात समाज परिवर्तन आणि साहित्य क्षेत्राच्या माध्यमातून उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल कुंडलवाडी येथील निवृत्त मुख्याध्यापक तथा पत्रकार निवृत्ती गंगाराम वाघमोडे यांना महाराष्ट्र शासनाचा राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने देण्यात येणारा हा पुरस्कार दरवर्षी व्यसनमुक्ती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना दिला जातो. २०२३-२०२४ वर्षासाठी एन. जी. वाघमोडे यांची निवड करण्यात आली.

मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडलेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात महाराष्ट्राचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ आणि प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, डॉ. हर्षदीप कांबळे, दीपा मुधोळ मुंडे, डॉ. भारत कदम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

CMYK

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती...

# शिवार

# कांदा साठवणीसाठी आधुनिक तंत्रज्ञान!

**भारतात १७.४० लाख हेक्टर क्षेत्रफळावर कांदा लागवड होते. कांद्याचे उत्पादन ३०२ लाख मेट्रिक टन होते. महाराष्ट्रात ६.६० लाख हेक्टर क्षेत्रफळावर कांदा लागवड होते. त्याचे उत्पादन ८९.०५ लाख मेट्रिक टन इतके होते. कांदा पीक लागवडीनंतर ३ ते ४.५ महिन्यांत तयार होतो. कांद्याची पात पिवळी पडून कांदा मानेत पिवळा पडतो आणि पात आडवी पडते, यालाच 'मान मोडणे' असे म्हणतात. सर्वसाधारणपणे ६० टक्के माना पडल्या की कांदा काढणीस तयार झाल्याचे समजले जाते.**



## साठवणगृहाची स्थिती

राज्यातील एकूण कांदा उत्पादनांपैकी खरिपात ४० टक्के, तर रब्बी व उन्हाळी हंगामामध्ये ६० टक्के उत्पादन होते. अजूनही अनेक कांदा साठवण्याच्या सोई किंवा चाळी नाहीत. परिणामी कांदा सडणे, खराब होणे यांचे प्रमाण मोठे वाढते. त्यामुळे दरांत घट सोसूनही कांदा विक्री करण्याशिवाय पर्याय राहत नाही. आपल्या लागवडीच्या प्रमाणात कांदा साठवणीची सोय करण्यास प्राधान्य द्यावे. साठवणगृहात ६५ ते ७० टक्के आर्द्रता व तापमान २५ ते ३० अंश सेल्सिअसच्या दरम्यान असावे लागते. साठवणुकीच्या सुरुवातीच्या काळात म्हणजे मे ते जुलै महिन्यांत काही काळ अधिक तापमान आणि काही काळ अधिक आर्द्रता असते. या काळात वजनातील घट व सडण्याची क्रिया संभवते. साठवणुकीनंतर ऑगस्ट ते नोव्हेंबर महिन्यांत तापमान खाली येते व आर्द्रता वाढते. या काळात कांद्यांना कोंब फुटण्याचे प्रमाण वाढते. आपल्या कांद्याला योग्य दर येईपर्यंत साठवण्याची क्षमता तयार करावी. त्यासाठी आधुनिक किंवा सुधारीत कांदा चाळी तयार करण्याला शेतकऱ्यांनी प्राधान्य द्यावे.

## पारंपरिक साठवण

- » मातीची किंवा बांबूची शेड्स : या पद्धतीमध्ये माती किंवा बांबूद्वारे चारही बाजूने हवा खेळती राहील असे साठवणगृह तयार केले जाते. त्यासाठी शेडमध्ये छोट्या जाळीमध्ये किंवा पोत्यामध्ये भरून कांदा साठवला जातो. यात खेळती हवा व सकाळ संध्याकाळचा सूर्यप्रकाश आत येत असल्याने आर्द्रतेचे प्रमाण कमी राहते.
- » खोलीतील साठवणूक : शेतकऱ्याकडे शिल्लक रिकाम्या खोलीतील मोकळ्या जागेत जाळी किंवा ढीग स्वरूपात कांदा साठवता येतो किंवा कांदा पोत्यामध्ये भरून पोती एकावर एक ठेवली जातात. मात्र दोन ओळींमध्ये योग्य अंतर ठेवले जाते. त्यामुळे हवा खेळती राहण्यास मदत होते. फक्त यात पोती जमिनीवर न रचता लाकडी पट्ट्या किंवा लोखंडी पट्ट्यावर ठेवावीत.

## आधुनिक साठवण

- » नैसर्गिक हवा खेळती राहणाऱ्या कांद्यामध्ये साठवणुकीसाठी पोषक वातावरण नियंत्रित करण्यास मोठया प्रमाणावर अडचणी येतात. वादळ, वारा अति जास्त पाऊस यांमुळे पारंपरिक कांदा चाळीमध्ये कांदा खराब होण्याचे प्रमाण वाढत आहे. हे प्रमाण कमी करण्यासाठी शास्त्रज्ञांनी नियंत्रित वातावरणात कांदा साठवण्याचे नवीन तंत्रज्ञान विकसित केले आहे. या साठवणगृहात बंदिस्त आणि नियंत्रित वातावरणात कांदे साठविले जातात. यामध्ये २५ ते ३० अंश सेल्यिअस तापमान व ६०-६५ टक्के आर्द्रता आणि हवा खेळती राहण्यासाठी व्यवस्था केली आहे. या कांदा चाळीमध्ये कांदा सडण्याचे, कांद्याला कोंब येण्याचे प्रमाण कमी आहे.
- » साठवण शेड्स (गृह) : ही सामान्यतः स्टील, लोखंड, सिमेंट आणि टीन याद्वारे तयार केली जातात. त्यांची उंची साधारण १२ ते १५ फूट आणि रुंदी २० ते २५ फूट असते. त्याच्या चारही बाजूंनी हवा खेळती राहण्यासाठी व्यवस्था केलेली असते. अशा शेड्समध्ये कांदा साठवणुकीसाठी चाळी बनवून किंवा पोती योग्य उंचीपर्यंत एकावर एक रचून साठवली जातात. त्यात कांदा दीर्घकाळ टिकतो.
- » वायुविजनयुक्त शेड्स : साठवणुकीत हवा खेळती नसेल तर कांदा खराब होण्याचे प्रमाण जास्त असते. शेड्समध्ये हवा खेळती ठेवण्यासाठी चोहोबाजूंनी खिडक्या आणि छतावर वायुविजनासाठी पाइप्स असतात. त्यामुळे अंतर्गत तापमान व आर्द्रतेचे प्रमाण नियंत्रणात ठेवले जाते.

## शीतगृहातील साठवण

- » शीतगृहामध्ये कांदा साठवणीसाठी साधारणपणे ० ते ५ अंश सेल्सिअस तापमान आणि ६०-६५ टक्के आर्द्रता राखली जाते. यात ६ महिन्यांपेक्षाही जास्त काळ कांदा चांगला राहू शकतो. कांद्याची गुणवत्ता आणि पौष्टिक घटक जास्त कालावधीसाठी टिकून राहत असल्याने निर्यातीसाठीच्या कांदा साठवणीसाठी त्याचा वापर होतो.
- » नियंत्रित वातावरणातील शीतगृह साठवण : या पद्धतीमध्ये तापमान, आर्द्रतेसोबत अंतर्गत प्राणवायूचे प्रमाण नियंत्रित केले जाते. त्याच वेळी नायट्रोजन व कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढविले जाते. यामुळे कांदा दीर्घकाळ ताज्या स्थितीत राहतो. सडण्याचे प्रमाणही खूपच कमी होते.

## पारंपरिक चाळ

नैसर्गिक वायूवर आधारित चाळ ही एकपाखी चाळीची उभारणी दक्षिण उत्तर करावी. दोन पाखी चाळीची उभारणी पूर्व-पश्चिम करावी. चाळीची लांबी ही पन्नास फुटांपेक्षा आणि रुंदी ५ फुटांपेक्षा कमी असावी. चाळीतील कांद्याच्या ढिगांची उंची ५ फटुांपेक्षा जास्त असू नये. अधिक उंचीमुळे तळातील कांद्यावर वजन वाढते, हवा खेळती राहत नाही. परिणामी, खालील थरातील कांद्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. तळाशी हवा खेळती राहील अशी रचना करावी. चाळीच्या बाजूच्या भिंती या लाकडाच्या किंवा बांबूच्या असाव्यात. त्यास फटी असाव्यात. चाळीसाठी उंचावरील पाणी साठणार नाही अशी मोकळी जागा निवडावी. पत्र्यांना पुरेसा ढाळ देऊन पत्रे १ ते २.५ मीटरपर्यंत बाहेर काढावेत. पावसाळ्यात ओसाड्यांपासून बचाव होतो. चाळीवर सिमेंटचे पत्रे व त्यावर उसाच्या पाचटाचे आच्छादन केले तर तापमान कमी राहण्यास मदत होते. चाळीचे छप्पर उतरते असावे.

# उन्हाळ्यात फळबागांची काळजी कशी घ्यावी?

**उन्हाळ्यामध्ये फळबागांमध्ये सूक्ष्म सिंचन पद्धती, आच्छादन, बाष्परोधकांचा वापर करणे आवश्यक आहे. जेणेकरून वाढत्या तापमानाचा विपरित परिणाम फळझाडांवर होणार नाही. सध्या कमाल आणि किमान तापमानात चांगलीच वाढ होण्यास सुरुवात झाली आहे. सकाळी व सायंकाळी थोडा गारवा तर दिवसा सर्वसाधारण ३५ ते ३८ अंश सेल्सिअसपर्यंत तापमान अशी स्थिती पाहायला मिळते आहे. सूर्यप्रकाश, उष्ण वारे, कोरडी हवा यांचा विपरीत परिणाम नवीन लागवड केलेल्या फळझाडांवर तसेच फळे देणाऱ्या झाडांवर होत होतो. यामुळे मुख्यत्वे कोवळी फूट करपणे, खोड तडकणे, फळगळ होणे, फळांचा आकार लहान होणे तसेच पाने, फळे गळून झाडे वाळून जाणे, झाडांची वाढ थांबणे आणि शेवटी झाड मरणे असे प्रकार होतात. त्यामुळे फळबागांचे मोठे नुकसान होते. याकरिता पाण्याचा आणि उपलब्ध संसाधनांचा कार्यक्षम वापर होऊन उन्हापासून फळबागांचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे.**




## पाण्याचा कार्यक्षम वापर

उन्हाळ्यात शक्यतो ठिबक सिंचन किंवा भूमिगत सिंचन पद्धतीने थेट फळझाडांच्या मुळापाशी गरजेनुसार पाणी देणे फायदेशीर ठरते. या पद्धती दुष्काळी किंवा पाण्याची कमतरता असलेल्या क्षेत्राकरिता अत्यंत फायदेशीर ठरतात. या पद्धतीत इतर प्रचलित पद्धतीपेक्षा ५० ते ६० टक्के पाण्याची बचत होते आणि उत्पादनात १० ते १५ टक्के वाढ मिळू शकते. या पद्धतीमुळे झाडांना गरजेनुसार पाणी उपलब्ध होऊन पाण्याचा अपव्यय टाळला जातो. याशिवाय सिंचनाच्या पाण्याबरोबर खतमात्रा देखील देणे शक्य होते. त्यामुळे खतांवरील खर्चात बचत होते. फळबागेस किंवा पिकांना शक्यतो सकाळी अथवा रात्री सिंचन करावे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर होतो. पाण्याची कमतरता असलेल्या क्षेत्रात एकआड एक सरीने पाणी द्यावे. तसेच पाण्याच्या दोन पाळ्यांमध्ये वाढ करावी. उदा. एखाद्या बागेस १० दिवसांच्या अंतराने पाणी देत असल्यास पुढील पाणी १२ दिवसांनी, त्यापुढील पाणी १५ दिवसांनी द्यावे. अशा प्रकारे जमिनीचा मगदूर, तापमान आणि पाण्याची उपलब्धता या बाबी विचारात घ्याव्यात.

## मडका सिंचन पद्धत

ही पद्धती कमी क्षेत्रातील व जास्त अंतरावरील फळझाडांना पाणी देण्यासाठी आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरते. मडकी शक्यतो जादा छिद्रांकीत किंवा आढीत कमी भाजलेली असावीत. पक्क्या भाजलेल्या मडक्याच्या बुडाकडील बाजूस लहानसे छिद्र पाडावे व त्यात कापडाची चिंधी किंवा नारळाची शेंडी बसवावी. एका झाडासाठी दोन मडकी जमिनीत खड्डा खोदून त्यात ठेवावीत. त्या मडक्यात संध्याकाळी पाणी भरून त्यावर झाकणी किंवा लाकडी फळी ठेवावी. त्यामुळे मडक्यातील पाणी बाष्पीभवनाने वाया जाणार नाही. या पद्धतीमुळे पाण्याची ७० ते ७५ टक्के बचत होते. लहान झाडांना (दोन ते तीन वर्षांकरिता) ५ ते ७ लिटर पाणी बसेल इतक्या क्षमतेची लहान मडकी वापरावीत. जास्त वयाच्या मोठ्या झाडांकरिता १० ते १५ लिटर पाणी बसेल अशी मडकी वापरावीत.

## बोर्डो पेस्टचा वापर

उन्हामुळे झाडातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यास झाडांच्या खोडावरील साली तडकण्याचे प्रमाण वाढू शकते. अशावेळी झाडांचे बुरशीजन्य व इतर रोगांपासून संरक्षण करण्याच्या दृष्टीने खोडांना बोर्डो पेस्ट लावणे गरजेचे असते. सर्वसाधारणपणे १ ते २ मीटर उंचीपर्यंत चुन्याची पेस्ट किंवा बोर्डोपेस्ट लावावी. बोर्डो पेस्ट लावण्याने सूर्यकिरण परावर्तीत होण्यास मदत होते तसेच साल तडकत नाही.



## बाष्परोधकांचा वापर

फळझाडांनी जमिनीमधून शोषलेल्या एकूण पाण्यापैकी ९५ टक्के पाणी वनस्पती पर्णोत्सर्जनाद्वारे हवेत सोडतात. हे वाया जाणारे पाणी बाष्परोधकाचा वापर करून अडविता येते. बाष्परोधकांचे पर्णरंध्रे बंद करणारी आणि पानांवर पातळ थर तयार करणारी असे दोन मुख्य प्रकार आहेत. पर्णरंध्रे बंद करणाऱ्या बाष्परोधकांमध्ये फिनील मरक्युरी ॲसिटेट (Phenyal mercury acetate), ॲबसिसिक ॲसिड तर पानांवर पातळ थर तयार करणाऱ्या बाष्परोधकांमध्ये केओलीन, सिलिकॉन ऑइल, मेण यांचा समावेश होतो.

## लहान रोपांना सावली करणे...

कडक उन्हापासून नवीन लागवड केलेल्या फळझाडांच्या रोपांचे संरक्षण करण्यासाठी पहिली १ ते २ वर्षे रोपांवर सावली करावी. त्यासाठी रोपाच्या दोन्ही बाजूंना ३ फूट लांबीचे बांबू रोवावेत. या बाबूंना चारही बाजूंनी व मधून तिरकस असे बांबू किंवा कामट्या बांधून त्यावर वाळलेले गवत अंथरावे. या गवतावरून तिरकस काड्या सुतळीने व्यवस्थित बांध्याव्यात. वाळलेल्या गवता ऐवजी बारदाना किंवा शेडनेटचा वापर करावा. बागेभोवती अगदी सुरुवातीलाच शेवरी, मलबेरी, चिलार, विलायती चिंच, सुबाभूळ, ग्लिरिसिडीया, सुरू, शेर, निवडुंग यापैकी उपलब्ध वनस्पतींची सजीव कुंपण म्हणून लागवड करावी. त्यामुळे फळबागेचे उष्ण वाऱ्यांपासून संरक्षण होते. बाष्पीभवनाचा वेग कमी होतो.

## खतांची फवारणी


उन्हाळी हंगामात बाष्पीभवन व पर्णोत्सर्जनाचा वेग जास्त असल्यामुळे फळझाडांची पाने कोमजतात. पानांतील पाण्याचे प्रमाण कमी होऊन अन्ननिर्मिती प्रक्रिया मंदावते. अशावेळी पोटॅशिअम नायट्रेट ($KNO_3$) १० ते १५ ग्रॅम आणि विद्राव्य डायअमोनियम फॉस्फेट (DAP) २ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे २५ ते ३० दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. यामुळे अन्ननिर्मिती प्रक्रिया गतिमान होण्यास मदत होते.

## आच्छादनांचा वापर

उन्हाळ्यात जमिनीतून पाण्याचे बाष्पीभवन अधिक होते. आच्छादनांचा वापर केल्यामुळे बाष्पीभवनाचा वेग कमी करता येतो. त्यामुळे जमिनीत ओलावा टिकवून ठेवण्यास मदत होते. आच्छादनाकरिता पालापाचोळा, वाळलेले गवत, लाकडी भुस्सा, उसाचे पाचट, गव्हाचे काड, भाताचे तूस अशा सेंद्रिय संसाधनांचा वापर करावा. सेंद्रिय आच्छादनाची जाडी १२ ते १५ सें.मी. असावी. सेंद्रिय आच्छादनाच्या वापरामुळे जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते. आच्छादनासाठी पॉलिथीन फिल्मचा वापरही मोठ्या प्रमाणात केला जातो. आच्छादनासाठी सेंद्रिय पदार्थांचा वापर केल्यामुळे कालांतराने ते कुजून त्यापासून उत्कृष्ट सेंद्रिय खत उपलब्ध होते. त्याचा जमिनीस आणि पिकांना फायदा होतो.

### महत्त्वाच्या बाबी...

नारळाच्या लहान रोपांना सावली करणे अत्यंत आवश्यक असते. अन्यथा रोपांची मरतुक होते. केळीचे घड झाकून घ्यावेत. म्हणजे करपणार नाहीत. डाळिंब फळे तडकण्याची शक्यता असते. फळांचे कडक उन्हापासून संरक्षण मिळण्यासाठी कागदी पिशव्या बांधाव्यात. बागेभोवती शेवरी, ग्लिरिसिडीया, मलबेरी, विलायती चिंच, सुबाभूळ यांचे कुंपण करावे. अशा सजीव कुंपणामुळे उष्ण वारे किंवा वादळांमुळे बागेचे नुकसान होत नाही. द्राक्ष, संत्रा, मोसंबी आदी फळझाडांना बोर्डो पेस्ट लावावी. लहान झाडावरील फुले, फळे काढून टाकावीत. झाडांची हलकी छाटणी करून घ्यावी. उन्हाळ्यात आवश्यकता असेल तर रासायनिक खते थोड्या प्रमाणात द्यावीत. फळझाडांवर १ ते १.५ टक्का म्युरेट ऑफ पोटॅशची फवारणी केल्यास फळझाडांना पाण्याचा ताण बसणार नाही.



# उन्हाळ्यातील एकात्मिक कीड व्यवस्थापन

**एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीमध्ये पीक लागवडीपासून कीड नियंत्रणाच्या विविध पद्धतीचा वापर केला जातो. त्या माध्यमातून किडींची संख्या आर्थिक नुकसानीच्या पातळीखाली ठेवली जाते. यामध्ये पर्यावरणाचा समतोल राखण्यावर भर दिला जातो. त्यासाठी लेबलक्लेम असलेल्या कीडनाशकांचा कमी वापर केला जातो. त्यामुळे पीक उत्पादनामध्ये कीटकनाशकांचे अंश राहत नाहीत.**

एकात्मिक कीड व्यवस्थापनामध्ये मशागतीय, भौतिक, रासायनिक, जैविक पद्धतींचा अवलंब केला जातो. त्यातील मशागतीय पद्धतीमध्ये कोणत्याही किडीचा प्रादुर्भाव झाल्यानंतर नियंत्रणासाठी उपाय करण्यापेक्षा प्रतिबंधात्मक उपाय म्हणून या पद्धतीचा अवलंब केला जातो. मशागतीय कीड नियंत्रण पद्धतीचा वापर गावपातळीवर सामुदायिकरीत्या केला तर पिकांवर येणाऱ्या किडींचे प्रभावी आणि कमी खर्चात व्यवस्थापन होऊ शकते.





## शेतजमिनीची खोल नांगरट

एकात्मिक कीड व्यवस्थापन तंत्रामध्ये उन्हाळ्यात खोलवर नांगरणी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. उन्हाळी नांगरटीमुळे जमिनीत साधारण १० सें.मी.पर्यंत सुप्तावस्थेत गेलेल्या किडीच्या अवस्था खोल नांगरणीमुळे उघड्या पडतात. त्यांना पक्ष्यांद्वारे खाल्ले जाते किंवा प्रखर सूर्यप्रकाशामुळे नष्ट होतात. उदा. घाटे अळीची कोष, टोमॅटोवरील फळ पोखरणारी अळीची कोष, टरबुज व खरबूज पिकातील फळमाशीची देखील कोष अवस्था जमिनीची नांगरणीने नष्ट होते. गोगलगायींचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव असलेल्या शेतात खोलवर नांगरणी केल्याने नुकसान कमी होते. सीताफळात पिठ्या ढेकूण किडींची मादी मे-जून महिन्यांत ३०० ते ४०० अंडी अंडीपुजांमध्ये जमिनीत झाडाभोवती घालते. उन्हाळ्यात खोलवर नांगरणी केल्यास अंडी अवस्था उघड्यावर येऊन प्रादुर्भावदेखील कमी होऊ शकतो. मोसंबी बागेतील गुळवेल व वासनवेल या वनस्पती मुळासकट नष्ट कराव्यात. कारण रस शोषणाऱ्या पतंगाची अळी अवस्था यजमान पीक म्हणून ही या वनस्पतीवर राहते. हळद लागवडीपूर्वी शेताची खोलवर नांगरणी करून कमीत कमी ३० दिवसांपर्यंत सूर्यप्रकाशाच्या साह्याने मातीचे निर्जंतुकीकरण करावे. त्यामुळे सूत्रकृमींचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते. उन्हाळ्यात कुजलेल्या शेणखताचा वापर करताना, मेटाऱ्हायझिम ॲनिसोप्ली ही जैविक बुरशी १ किलो प्रति टन शेणखतात मिसळावे. म्हणजे मातीतील किडींपासून पिकांना संरक्षण मिळेल. उदा. हुमणी अळी, रोप कुरतडणारी अळी आदी. शेतातील पिकांचे अवशेष नष्ट करावेत. जसे की कापूस पिकामध्ये जमिनीवर पडलेल्या बोंडामधील सरकीमध्ये गुलाबी बोंड अळी सुप्तवस्थेत जाते. त्यामुळे ते गोळा करून नष्ट करणे गरजेचे आहे. उन्हाळ्यात (मे किंवा जून महिन्यांत) शेतात विजेचा बल्ब लावून त्याखाली एका टबमध्ये रॉकेलमिश्रित पाणी किंवा कीटकनाशक मिश्रित पाणी ठेवल्यास पतंग, भुंगे आदीआकर्षित होऊन पाण्यात पडून मरतात. उदा. हुमणीचे प्रौढ भुंगेरे, विविध किडीचे पतंग. उन्हाळ्यात जिनिंग परिसरात गुलाबी बोंड अळीसाठी कामगंध सापळ्यांचा वापर करावा. जेणेकरून त्यात पतंग अडकतील आणि प्रादुर्भाव कमी होईल. ऊस शेतातील तसेच बांधावर असलेली वाळवीची वारुळे खोदून वाळवीच्या राणीसह नष्ट करावीत. जेणेकरून उसामध्ये वाळवीचा होणारा प्रादुर्भाव टाळला जाईल. विविध पिकांतील सूत्रकृमीच्या व्यवस्थापनाकरिता जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा पावडर २ किलो प्रति २५० किलो कुजलेले शेणखत प्रति एकर प्रमाणामध्ये मिसळून वापर करावा.

# ‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ अभियानाला १ एप्रिलपासून प्रारंभ

**नेपाळ (वृत्तसंस्था)** – नेपाळचे माजी पंतप्रधान केपी शम

**मुंबई (प्रतिनिधी)** – महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने ‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ हे अत्यंत महत्त्वाकांक्षी अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या पुढाकाराने राबविण्यात येणाऱ्या या राज्यव्यापी अभियानाला १ एप्रिलपासून प्रारंभ होत आहे.




हे अभियान फक्त सरकारी कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता, लोकसहभागाद्वारे त्यातून एक व्यापक आरोग्य चळवळ उभी राहावी, असा राज्य शासनाचा मानस आहे. या अभियानांतर्गत प्रत्येक गाव आरोग्यसंपन्न केले जाणार आहे. या प्रस्तावित योजनेमुळे गावापासून ते राज्यस्तरावरील आरोग्य सेवांचे आणि यंत्रणांचे सक्षमीकरण होण्यास मदत होणार आहे. तसेच या उपक्रमामुळे तळागाळातील लोकांपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचणार आहेत.

‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ या अभियानाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधावर भर, हे आहे. ग्राम ीण भागातील नागरिकांच्या आरोग्यविषयक सामाजिक वर्तणुकीत सकारात्मक बदल घडवून आणणे आणि त्यांच्यात आरोग्यदायी जीवनशैली रुजवणे हे या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट आहे. यामध्ये फक्त आजारांवर उपचार करण्यापेक्षा ते होऊ नयेत यासाठी सार्वजनिक स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि पोषण यासारख्या मूलभूत घटकांवरही विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. संसर्गजन्य आजारांसोबतच बदलत्या जीवनशैलीमुळे उद्भवणारे असंसर्गजन्य आजार, माता-बाल आरोग्य आणि मानसिक आरोग्य यासारख्या विषयांनाही या मोहिमेत सामावून घेण्यात आले आहे. या अभियानात ग्रामपंचायतीपासून ते जिल्हा परिषदेच्या आरोग्य यंत्रणा सक्रियपणे सहभागी होणार आहेत. गावागावात स्वच्छतेचा आणि आरोग्याचा जागर करून आरोग्यदायी गाव ही संकल्पना राबवण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असणार आहे.


‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य स्तरापासून ते ग्रामपंचायत स्तरापर्यंत तीन टप्प्यांवर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समिती ही अभियानाच्या संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवणार आहे.

## धावत्या टँकरखाली उडी घेत मजुरानं संपवलं जीवन

**चंद्रपूर (प्रतिनिधी)** – रस्त्यावर धावणाऱ्या डिझेलच्या टँकरखाली झोकून देत एका मजुराने आत्महत्या केली आहे. बल्लारपूर शहरात ही धक्कादायक घटना घडली आहे. आत्म हत्येची घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. मृताची ओळख भैरव खेडू ठाकूर (४०) अशी पटली आहे. आत्महत्येचं कारण अद्याप समजलेलं नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत मजूर बिहारचा रहिवासी असून तो बांधकामावर मजूर म्हणून काम करत होता. काल दुपारी एक डिझेल टँकर राजुरा शहराच्या दिशेने जात होता, तेव्हा रस्त्याच्या कडेला झाडाखाली बसलेल्यांपैकी एकाने उठून थेट टँकरच्या पुढच्या चाकासमोर स्वतः ला झोकून दिले. टँकरचे पुढचे चाक त्याच्या अंगावरुन गेल्यानं त्या तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे. अचानक घडलेल्या या घटनेमुळं घाबरलेल्या टँकर चालकाने तात्काळ टँकर थांबवला आणि तो घटनास्थळावरुन पळून गेला. आत्महत्येमागील कारण अज्ञात असून पोलीस तपास करत आहेत.

# येत्या तीन महिन्यांत ‘पीएनजी’ साठी अर्ज न केल्यास ‘एलपीजी’ सिलिंडर बंद



**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील ज्या शहरी भागांमध्ये पाइपद्वारे गॅस (पीएनजी) जोडणीची सुविधा उपलब्ध आहे, तिथे नागरिकांनी येत्या तीन म हिन्यांत अर्ज करणे बंधनकारक आहे. पीएनजी वाहिनी कार्यान्वित असूनही नागरिक अर्ज करत नसल्यास, त्या भागातील घरगुती गॅस (एलपीजी) सिलिंडरचा पुरवठा बंद केला जाऊ शकतो, असा इशारा अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी सोमवारी दिला. मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

आखाती देशातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील इंधन पुरवठ्याबाबत सरकारची भूमिका त्यांनी स्पष्ट केली. भुजबळ म्हणाले, जागतिक स्तरावर युद्धजन्य परिस्थिती असली, तरी भारतात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता अफवांवर विश्वास ठेवू नये. रशिया आणि व्हेनेझुएला यांसारख्या देशांकडून नियमितपणे इंधन पुरवठा होत असून, भारतीय जहाजांची ये-जा सुरू असल्याने तुटवड्याची कोणतीही शक्यता नसल्याचे भुजबळ यांनी नमूद केले. बाजारातील मागणी लक्षात घेता सरकारने व्यावसायिक वापरासाठीच्या गॅस पुरवठ्यात ५० टक्क्यांपर्यंत वाढ केली आहे. एलपीजीचा साठाही मोठ्या प्रमाणात वाढवण्यात आला असून, पुरवठा साखळी सुरळीत ठेवण्यासाठी युद्धपातळीवर उपाययोजना केल्या जात आहेत. ज्या नागरिकांनी पीएनजीसाठी अर्ज केला आहे, मात्र अद्याप त्यांच्यापर्यंत वाहिनी पोहोचलेली नाही, अशा ग्राहकांचा एलपीजी पुरवठा कोणत्याही परिस्थितीत खंडित केला जाणार नाही, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. रेशनवर तीन महिन्यांचे धान्य मिळणार इंधन पुरवठ्यासोबतच रेशन धान्याबाबतही सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. राज्यात धान्याचा पुरेसा साठा असून, नागरिकांना आता तीन महिन्यांचे धान्य एकाच वेळी घेण्याची मुभा देण्यात आली आहे. याशिवाय, जिथे गॅसची सुविधा कमी आहे, तिथे केरोसीन उपलब्ध करून दिले जाणार आहे. पीएनजी वाहिनी टाकण्यासाठी आता स्वतंत्र परवानग्यांची गरज भासणार नाही, सरकारच ही प्रक्रिया सुलभ करणार आहे. पीएनजी हा सुरक्षित आणि स्वस्त पर्याय असून त्याचा विस्तार करणे काळाची गरज आहे. त्यामुळे उपलब्ध सुविधा असलेल्या भागातील नागरिकांनी तातडीने अर्ज करावेत, असे आवाहन मंत्री भुजबळ यांनी केले. त्याचप्रमाणे राज्यात कोणत्याही प्रकारचा लॉकडाऊन लागू होणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांची अण्णा बनसोडे यांच्या शिष्टमंडळाने घेतली भेट



**मुंबई (प्रतिनिधी)** – भारताचे उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांची महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या शिष्टमंडळाने उपराष्ट्रपती भवन येथे सदिच्छा भेट घेतली. या भेटीत १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त चैत्यभूमी येथे उपस्थित राहण्याची विनंती उपराष्ट्रपतींना करण्यात आली. या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत उपराष्ट्रपतींनी तत्काळ होकार दर्शवला.

यावेळी त्यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून कार्यरत असताना चैत्यभूमीला दिलेल्या भेटींच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच दादर येथे सुरू असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक कामाबाबतही त्यांनी शिष्टमंडळाकडे माहिती घेतली. स्मारकाच्या कामाला अधिक गती मिळावी यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, बोधगया संबंधित प्रश्नावरही शिष्टमंडळाने उपराष्ट्रपतींसोबत औपचारिक चर्चा केली. या प्रसंगी शिष्टमंडळाकडून उपराष्ट्रपतींना गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा भेट देण्यात आल्या. या भेटीत सुनील मगरे, सिद्धार्थ बनसोडे, नागसेन कांबळे, भदंत राहुल बोधी, बाळासाहेब करडक, आनंद चंदनशिवे, संजय अवसरमोल, शिल्पकार अनिल सुतार,सुबोध भारत, विजय अंभुरे आणि रामनाथ दवणे आदी उपस्थित होते.

# खडसे पिता-कन्येविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल

**मुंबई (प्रतिनिधी)** – राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे आणि त्यांच्या कन्या शारदा खडसे यांच्याविरोधात जळगाव जिल्ह्यातील बोदवड पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साखर कारखाना उभारण्याचे आमिष दाखवून शेतकऱ्यांच्या महार वतनाच्या जमिनी हडपल्याचा गंभीर आरोप त्यांच्यावर करण्यात आला असून, या घटनेमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

हे प्रकरण २००२ सालातील आहे. भुसावळ तालुक्यातील मानपूर शिवारातील गट क्रमांक १२२ ही महार वतनाची जमीन चमेलाबाई तुकाराम तायडे आणि त्यांच्या वारसदारांच्या मालकीची होती.



फिर्यादीनुसार, एकनाथ खडसे यांनी या परिसरात ‘तापी-पूर्णा सहकारी साखर कारखाना’ सुरू करण्याचे आमिष दाखवून ही जमीन खरेदी करण्याची तयारी दर्शवली होती. जमिनीचा चांगला मोबदला आणि कुटुंबातील सदस्यांना कारखान्यात रोजगार देण्याचे आश्वासन त्यावेळी देण्यात आले होते. तक्रारदार चमेलाबाई तायडे यांच्या म्हणण्यानुसार, खडसे यांनी त्यांच्या अशिक्षितपणाचा फायदा घेत ५१ हजार रुपये आगाऊ दिले आणि सर्वांचे अंगठे घेऊन बोदवड दुय्यम निबंधक कार्यालयात जमिनीची खरेदी केली. मात्र, अनेक वर्षे उलटूनही तिथे कारखाना उभारला गेला नाही. २०२५ मध्ये कुटुंबाने या जमिनीची माहिती काढली असता, ही जमीन कारखान्याच्या नावावर नसून शारदा एकनाथ खडसे यांच्या वैयक्तिक नावावर असल्याचे समोर आले. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी जेव्हा मूळ खरेदीखताची प्रत तपासण्यात आली, तेव्हा त्यात धक्कादायक फेरफार दिसून आले.

खरेदीखतामध्ये जिथे ‘तापी-पूर्णा शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज’ असे नाव होते, तिथे खाडाखोड करून ’शारदा एकनाथ खडसे’ असे नाव लिहिल्याचे निष्पन्न झाले. यानंतर तायडे कुटुंबाने रिपाइं (आठवले गट) जिल्हाध्यक्ष अनिल अडकमोल यांच्या मदतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेतली.

## १२ वी नंतर विमानतळावर करिअरची मोठी संधी

**मुंबई (प्रतिनिधी)** – सध्याच्या काळात विमान वाहतूक क्षेत्र हे जगातील सर्वात वेगाने विकसित होणाऱ्या उद्योगांपैकी एक म्हणून समोर आले आहे. या विस्तारामुळे तरुणांसाठी रोजगाराच्या नवनवीन आणि प्रगत वाटा खुल्या झाल्या आहेत. केवळ आकर्षक पगारच नाही, तर एक प्रतिष्ठित जीवनशैली आणि व्यावसायिक प्रगती देणारे क्षेत्र म्हणून याकडे पाहिले जात आहे. या पार्श्वभूमीवर, ‘एअरपोर्ट ऑपरेशन्स’ हा अभ्यासक्रम करिअरला नवी दिशा देण्यासाठी अत्यंत प्रभावी ठरत आहे.

या विशेष प्रशिक्षणामुळे उमेदवारांना विमानतळावरील महत्त्वाच्या जबाबदाऱ्या हाताळण्यासाठी सक्षम केले जाते. प्रामुख्याने ग्राउंड स्टाफ ऑपरेशन्स, कॅबिन क्रू सेवा आणि ग्राहक सेवा यांसारख्या विभागांमध्ये स्वतःची ओळख निर्माण करण्याची मोठी संधी या अभ्यासक्रमामुळे मिळते.

## सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटनाला मिळणार ‘टेक ऑफ’

**मुंबई (प्रतिनिधी)** – कोकणच्या विकासाचा कणा असलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी महायुती सरकारने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि सुखद निर्णय घेतला आहे. चिपी (सिंधुदुर्ग) ते मुंबई या विमान प्रवासासाठी राज्य सरकारने १०० टक्के ‘व्हायबिलिटी गॅप फंडिंग’ला (व्हिजिएफ) प्रशासकीय आणि वित्तीय मंजुरी दिली आहे.

या ऐतिहासिक निर्णयामुळे आता सर्वसामान्य कोकणवासीयालाही परवडणाऱ्या दरात विमान प्रवास करणे शक्य होणार असून, खऱ्या अर्थाने कोकणच्या पर्यटनाला ‘टेक ऑफ’ मिळणार आहे. केंद्र सरकारच्या ‘आरसीएस-उडान’ योजनेच्या धर्तीवर हा निर्णय घेण्यात आला असून, यापूर्वी सोलापूर-पुणे-मुंबई मार्गासाठीही अशाच प्रकारे १०० टक्के निधी देण्यास मान्यता देण्यात आली होती. तोच नियम मुंबई-सिंधुदुर्ग प्रवासासाठी लागू करण्यात आला आहे. त्यानुसार, ही योजना प्रत्यक्ष विमानसेवा सुरू झाल्यापासून एक वर्षासाठी किंवा केंद्र सरकारच्या योजनेत समावेश होईपर्यंत लागू राहील. म हाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने प्रत्यक्ष विमान फेऱ्यांची गणना करूनच निधीची देयके सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे कोकणच्या विकासाला नवी दिशा मिळणार आहे. केवळ एका तासात मुंबई-सिंधुदुर्ग अंतर पार होणार असून, याचा मोठा फायदा चाकरमानी आणि व्यावसायिकांना होणार आहे.

# पुण्यात कोट्यवधींचे ड्रग जप्त

**पुणे (प्रतिनिधी)** – लोहगावच्या पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर कस्टम्स विभागाने २६ कोटी ८० लाख रुपयांचा ‘हायड्रोपोनिक गांजा’ जप्त केला. एवढ्या मोठ्या प्रमाणात ड्रग जप्त झाल्यामुळे पुण्यात चाललंय काय अशी चर्चा सर्वत्र होत आहे. एअर कार्गो विभागात गुरुवारी कस्टम्स विभागाने ही कारवाई केली. या प्रकरणी आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अखेर कस्टम्सने प्रसारम ाध्यमांना ही माहिती दिली.

थायलंडहून पुण्याच्या विमानतळावर एक कंटेनर आला. कागदपत्रांमध्ये चिनी खाद्यपदार्थांचा कंटेनर असा उल्लेख होता. पण संशय आल्यामुळे तपासणी करण्यात आली. ’मँडरिन ऑरेंज सॅक्स’ असे लेबल थर्माकोलच्या बॉक्सवर होते. पण कस्टम्सने तपासणी करण्याचा निर्णय घेतला आणि बॉक्स तपासल्यावर त्यात सील असलेले टीनचे डबे आढळले. हे डबे उघडताच त्यात मीठसदृश्य पांढरी पावडर दिसली. ही पावडर बाजूला करताच टीनमध्ये हवाबंद पाकिटात भरून लपवलेला ‘हायड्रोपोनिक गांजा’ सापडला. एकूण ७६.५८ किलो वजनाचा २६ कोटी ८० लाख रुपयांचा ‘हायड्रोपोनिक गांजा’ कस्टम्सने जप्त केला. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे. ड्रग कोणी कोणासाठी पाठवले आहे ? याचा शोध सुरू आहे.

## पुण्याला पावसाने झोपडले; आयटी पार्कमध्ये साचला बर्फ

**पुणे (प्रतिनिधी)** – ऐन उन्हाळयात भर दुपारी पावसाने पुण्यात हजेरी लावली. मुसळधार पाऊस, सोसाट्याचा पाऊस आणि गारपिटीने पुणेकरांना चांगलेच झोडपून काढले आहे. पुण्यातील आयटी पार्कमध्ये तर चक्क बर्फ साचला.

महाराष्ट्र हवामान विभागाने राज्यात काही दिवस पावसाचे संकेत दिले आहेत. त्यामुळे नागरिकांना हवामान बदलाचा त्रास हा सहन करावा लागणार आहे. पुणे जिल्ह्यातही काही ठिकाणी अशीच परिस्थिती निर्माण झाली. दुपारी अचानक वातावरणात बदल झाला, ढग दाटून आले, सोसाट्याचा वर सुरु झाला, आणि मुसळधार पावसाला सुरुवात झाली. या कोसळधार सोबत काही ठिकाणी गारपिटही पडली.


अ‍ॅड. एल.बी.भालके
जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड.
मो. नं. 9096562229.

दि. ३०/03/2026

जाहीर प्रगटन

माझे पक्षकार यशवंत रामचंद्र हेंद्रे, रा. विसावा नगर, नांदेड ता. जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून सर्व जनतेस व संबंधीतास सुचित करण्यात येते की,

माझे पक्षकार यांची मिळकत मौजे गडगा ता. नायगाव, जि. नांदेड येथील ग्रामपंचायत मालमत्ता क्र. 597 चे घर व मोकळी जागेची मुळ विक्रीखत क्र. 2645/2016 हे स्नेहनगर नांदेड येथुन शिवाजी नगर नांदेड येथे ॲटोने प्रवास करीत असतांना गहाळ झाले आहे. याबाबत पोलीस स्टेशन शिवाजीनगर नांदेड येथे हरवलेल्या मालमत्तेचा नोंद क्र. 85/2026 दिनांक 26/03/2026 रोजी नोंदवलेला आहे.

तरी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरचे वर नमुद कागदपत्रे कोणास आढळुन आल्यास खालील दिलेल्या पत्यावर कळवावे.

करीता सबब जाहिर प्रगटन.

दि. 30/03/2026
मार्फत,
अ‍ॅड. एल.बी.भालके,
नांदेड.
Laxmikant B.Bhalke
Advocate & Notary
(Appointed by Govt.of India)
Dist. Nanded (M.S.) India

जाहीर प्रगटन देणार
यशवंत रामचंद्र हेंद्रे
रा. विसावा नगर, नांदेड ता. जि. नांदेड
मो. नं. 9881025554.



## टी.सी. हरवली

माझी धुळगंडे प्रल्हाद रावसाहेब या नावाची बारावी कला पासची टी. सी. अहमदपूर ते माळेगाव यात्रा प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**संपर्क : धुळगंडे प्रल्हाद रावसाहेब (माजी सैनिक)**
**मो.नं. ९०२२५०४२२०**



## टी.सी. हरवली

माझी रमेश बाबुराव निवळे या नावाची दहावी पासची टी. सी. मरखेल ते देगलूर प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**पत्ता : रमेश बाबुराव निवळे**
**रा. मरखेल ता. देगलूर जि. नांदेड**
**मो.नं. ९०९६२७३३९८**



## डॉक्टर्स लेन / बोरबन स्थित ३ बाजूने रस्ते असलेली इमारत हॉस्पिटल / हॉस्टेलसाठी किरायाने देणे आहे.

डॉक्टर्स लेन बोरबन मधील ५ मजल्याची (प्रति मजला २२४६ चौ. फूट) इमारत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल / मुलींचे वसतिगृहासाठी भाड्याने देणे आहे. इमारतीच्या तिन्ही बाजूने रस्ते व तळमजल्यावर पार्किंग सुविधा उपलब्ध आहे. भुयार गृहात मेस / कँटिनसाठी जागा किरायाने देणे आहे. इच्छुकांनी संपर्क साधावा.



**चंद्रकांत वाहूळकर**
**८७६६४७१२०१**

**महेश शिरसे**
**८३९०६२८४१४**



## Change In Name

My Old Name is **MOHAMMED SAFAR SHAH** which now I am changing as New Name **SAFAR SHAH.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address -** H NO 9-7-769/1, NEAR NAGAR PALIKA SCHOOL, ISLAMPURA ITWARA NANDED MAHARASHTRA Mo.No. 7620644880



## Change In Name

My Old Name is **SHAIKH OSMAN** which now I am changing as New Name **SHAIKH USMAN SHAIKH MAULANA.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - N.D.2, 2W-4/11, Krnti Chowk, Cidco, Nanded 431603**
**Mo.No. 8830555109**



**गुरुकुल शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या, हिमायतनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड**

जाहीर प्रगटन

गुरुकुल शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या, हिमायतनगर ता.हिमायतनगर जि.नांदेड या संस्थेची पंचवार्षिक निवडणूक सन २०२६ ते २०३१ साठीची प्रारुप मतदान यादी संस्थेचे कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर व गुरुकुल शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या, हिमायतनगर.संस्थेचा 'फलक' येथे लावण्यात आलेली आहे. सदर मतदान यादीवर संस्थेच्या सभासदापैकी कुणाचा आक्षेप असल्यास दिनांक २५/०३/२०२६ ते ०३/०४/२०२६ पर्यंत संस्थेचे अध्यक्ष/सचिव व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरूपात आक्षेप नोंदवावेत. कृपया सदर तारखेनंतर आलेले आक्षेपाचा विचार केला जाणार नाही याची सभासदांनी नोंद घ्यावी.

(संतोष के.सरकटे)
निवडणूक निर्णय अधिकारी
गुरुकुल शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. हिमायतनगर
मोबाईल :- ९७६७१००५५८

अध्यक्ष-सचिव
गुरुकुल शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. हिमायतनगर जि. नांदेड
9421868728



## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. अन्वरुल्लाह खान पि. नुरुल्लाह खान व इतर, रा. नांदेड ता. जि. नांदेड यांनी मौ. ब्रम्हपुरी ता. जि. नांदेड सर्वे नं. ३८/२ मधील क्षेत्र ०० हे. ४२ आर जमिन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेव्हा मौ. ब्रम्हपुरी ता. जि. नांदेड सर्वे नं. ३८/२ मधील क्षेत्र ०० हे. ४२ आर ही जमीन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तकार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपातरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल पाची कृपया नोंद घ्यावी

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड**



## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. मोहम्मद खुर्शिद पि. अब्दुल जलीत, रा. मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड यांनी मौ. ब्रम्हपुरी ता. जि. नांदेड सर्वे नं. ३८/२ मधील क्षेत्र ०० हे. ४० आर जमिन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेव्हा मौ. ब्रम्हपुरी ता. जि. नांदेड सर्वे नं. ३८/२ मधील क्षेत्र ०० हे. ४० आर ही जमीन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल पाची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड**



## Change In Name

My Old Name is **Lone Sujit** which now I am changing as New Name **Sujit Digambar Yeolikar.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - H.No. 211, 2nd Floor, Balaji Apartment, Frande Park, Wadi Bk. Nanded 431605 Maharashtra India**



## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेंडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## अमृतसर, काशीच्या धर्तीवर नांदेडला 'होली सिटी' करा

### खा. डॉ. अजित गोपछडे यांची राज्यसभेत मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– शिख धर्मीयांची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि गुरू गोविंदसिंघजी यांच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेल्या नांदेडच्या सर्वांगीण विकासासाठी नांदेडला होली सिटी जाहीर करून विकास करावा, अशी मागणी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी सोमवारी राज्यसभेत केली. राज्यसभेत शून्यकाळ दरम्यान त्यांनी महत्त्वपूर्ण आग्रही मागणी करत नांदेडला जागतिक कीर्तीचे तीर्थस्थळ करण्याचे अनुषंगाने निवेदन केले आहे.

खा. गोपछडे पुढे म्हणाले की, नांदेड हे शीख बांधवांसाठी अत्यंत महत्त्वाचे तीर्थस्थळ आहे. शिखांचे दहावे गुरू श्री गुरु गोविंदसिंघजी यांची पावन समाधी असून, गुरुजींनी याच ठिकाणाहून बंदा सिंघ बहादुर यांना उत्तरेत मोहिमेसाठी पाठविले आणि इथेच 'गुरु मानियो ग्रंथ' ही ऐतिहासिक आज्ञा देऊन कायमस्वरूपी अकरावे गुरुंच्या स्वरूपात श्री गुरु ग्रंथ साहेब यांना याच धरतीवर विराजमान केले. हे असे सर्वार्थाने ऐतिहासिक पवित्र गोदावरी नदीच्या नाभी स्थानावर वसलेले शहर आहे. त्यामुळे नांदेडला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त झालेले आहे. अशा परिस्थितीत नांदेडचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे. राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावरील भाविक भक्तांसाठी स्थानिक घरेलू पर्यटकांसाठी मान्यवरांसाठी दर्जेदार सुविधा



उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यासाठी विकासाच्या व्यापक दृष्टिकोनातून नांदेड शहराला अमृतसर आणि काशीच्या धर्तीवर होली सिटी म्हणून घोषित करणे आवश्यक आहे. जेणेकरून या पवित्र नगरीला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र वेगळी ओळख मिळेल असे स्पष्ट करत नांदेडचा सर्वांगीण विकास व्यापक दृष्टिकोनातून राज्यसभेत मांडला.

तसेच नांदेडला एआय आणि आयटी हब म्हणून विकसित करण्याचा प्रस्तावही त्यांनी ठेवला. नांदेडमधील आरोग्य सेवांना बळकटी देण्यासाठी एम्ससह सुपर स्पेशालिटी रुग्णालयाची स्थापना करावी, नांदेडची वाहतूक आणि कनेक्टिव्हिटी वाढविण्यासाठी अमृतसर–हुजूर साहेब नांदेड दरम्यान स्लीपर वंदे भारत ट्रेन, नांदेड – पुणे आणि नांदेड–हैदराबाद मार्गावर वंदे भारत ट्रेन सुरू करावी, शहराच्या अंतर्गत पायाभूत सुविधांसाठी त्यांनी मेगा फ्लाईओवर्स उभारावी, तरोडेकर चौक ते मुथा चौक, हिंगोली गेट ते वाजेगाव (छत्रपती शिवाजी महाराज जंक्शन) यांच्या उभारणीची मागणी केली. शहराच्या शिस्तबद्ध विकासासाठी मास्टर प्लॅन तयार करत रिंग रोड प्रकल्प वेगाने राबविण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले

खा. डॉ. गोपछडे यांनी नांदेडची स्थानिक अर्थव्यवस्था आणि रोजगार निर्मितीच्या दृष्टीने नांदेडमध्ये डिफेन्स ऑर्डिनन्स फॅक्टरी स्थापन करण्याची मागणी केली. यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होऊन स्थानिक युवकांना नवीन संधी उपलब्ध होतील, असा प्रस्तावही त्यांनी सभागृहासमोर ठेवला.

## जिल्हा बँकेच्या विद्यमान कार्यकारिणीची शेवटची सभा संपन्न; २८ ठराव मंजूर

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील शेतकऱ्यांची कामधेनू म्हणून ओळख असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची मुदत ३ एप्रिलपर्यंत असल्यामुळे सोमवार, दि. ३० मार्च रोजी शेवटची सर्वसाधारण सभा घेण्यात आली होती. या गाजलेल्या सभेत तब्बल २८ ठराव मंजूर करण्यात आले आहेत. दरम्यान, या सभेत आगामी निवडणुकीसाठी संस्थांमार्फत १६ मार्च ते १५ एप्रिलपर्यंत ठराव मागविण्यात आले आहेत.

या बँकेच्या संचालक मंडळाची मुदत येत्या ३ एप्रिल रोजी पूर्ण होणार आहे. त्यामुळे शेवटची सर्वसाधारण सभा ३० मार्च रोजी आयोजित करण्यात आली होती. त्यात तब्बल २८ विषय ठेवण्यात आले होते. खर्चाला मान्यता देणे, बँकेचा मालमत्ता कर भरणे, इंधनाला मान्यता देणे, सेवानिवृत्तांना मान्यता देणे, नवीन सभासदांना मान्यता देणे, टॅक्स भरणा, तसेच १६ मार्च ते १५ एप्रिल दरम्यान जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी संस्थांकडून प्रस्ताव मागविणे यासह २८ विषयांचा समावेश होता.

दरम्यान संचालक बाबूराव कोंडेकर यांच्या शिफारसीनुसार गीताई सहकारी संस्था पिंपळगाव (नि) व संगीता पावडे यांनी शिफारस केलेल्या गुरु रविदास महिला सहकारी पतसंस्थेला सभासद मान्यता देण्यात आल्याचे समजते.

तसेच कोट्यवधी रुपयांचे कर्ज असलेल्या जिल्ह्यातील ४ संस्थांच्या कर्जमाफीवर चर्चा झाल्याचे समजते. यामुळे शेवटची सभा चांगलीच गाजली आहे. या सभेस बँकेचे अध्यक्ष भारकरराव पाटील खतगावकर, उपाध्यक्ष हनुमंत पाटील बेटमोगरेकर, खा. रवींद्र चव्हाण, गोविंद शिंदे नागेलीकर, रावणगावकर, बाबुराव कोंडेकर, हाणेगावकर, सौ. शिंदे, सौ. पावडे यांच्यासह संचालक मंडळ उपस्थित होते.

## खा. अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत मुदखेड तालुक्यातील कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

**नांदेड (प्रतिनिधी)**– माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते मुदखेड तालुक्यातील वाईच्या अनेक प्रमुख कार्यकर्त्यांनी सोमवारी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला.



वाईचे माजी सरपंच गोविंदराव पाटील शिंदे यांच्या पुढाकारातून सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन रामराव इंजेवाड, माजी सरपंच राजेश इंजेवाड, महेंद्र गिरी, दिलीप पाटील तिडके, ज्ञानेश्वर शिंदे, व्यंकटराव पाटील पवार, बालाजी पेंटेवाड, बालाजी तोटेवाड, गोविंदराव पाटील जाधव, मानेजी पाटील तिडके, मस्तानसाब पठाण, देवराव पाटील काळे, आनंदा हनवते, राहुल सोनकांबळे, शंकरराव हानवते, बी. जी. राठोड, केशव पाटील ढगे, उद्धव पाटील हंबर्डे, सुनील वाघमारे, भगवान हानवते आदींनी आज भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला.

यावेळी वरिष्ठ नेते गोविंदराव पाटील शिंदे नागेलीकर, मुदखेडचे भाजपा ग्रामीण तालुकाध्यक्ष दत्तू देशमुख वाडीकर, माजी जिल्हा परिषद सदस्य भीमराव पाटील कल्याणे, रोहिदास जाधव, मारोती पाटील शंखतीर्थकर, केशव मुंगल आदी उपस्थित होते.

## शिवनेरी जनसंपर्क कार्यालय सर्वसामान्यांचा आधार व्हावे - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### आ. बोंढारकर यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**नांदेड (प्रतिनिधी)** –दक्षिण नांदेड विधानसभा मतदारसंघाचे आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांचे शिवनेरी हे जनसंपर्क कार्यालय सर्वसामान्य जनतेचा आधार बनावे, अशी अपेक्षा व्यक्त करतानाच जात, धर्म, पंथ अथवा कुठलाही भेदभाव न बाळगता सर्वसामान्यांचे प्रश्न या कार्यालयातून सोडवले जावेत, असे उद्गार राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्यनेते एकनाथराव शिंदे यांनी काढले.


हिंगोली गेट परिसरात आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या शिवनेरी या जनसंपर्क कार्यालयाचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्यनेते एकनाथराव शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. ना. हेमंत पाटील, आ. आनंदराव बोंढारकर, आ. बालाजीराव कल्याणकर, आ. बाबुराव कदम कोहळीकर यांच्यासह अनेक मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे म्हणाले की, नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचा आमदार म्हणून तुम्ही आनंदराव बोंढारकर यांना निवडून दिला आहात. आनंदराव हे या भागाचे आमदार म्हणून विधानसभेत आपले प्रश्न मांडत आहेत. ते प्रश्न सोडवून घेण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करत आहेत. तुम्ही त्यांच्या पाठीशी उभे राहिलात म्हणून ते आमदार झाले. आता आमदार बोंढारकर यांच्यासह मीही आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. त्यामुळे नांदेड दक्षिणमध्ये विकासाची सर्व कामे नेटाने होतील. जनतेचे प्रश्न सोडवले जातील, असा विश्वासही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला.

आ. आनंदराव बोंढारकर हे सर्वसामान्य कुटुंबातील असताना आपण त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलात. त्यामुळे आता आगामी पाच वर्षांत आम्ही तुमच्या पाठीशी उभे राहून तुमच्या सर्व समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध राहू, असा विश्वासही एकनाथ शिंदे यांनी दिला. आ. बोंढारकर यांचे शिवनेरी जनसंपर्क कार्यालय हे सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी तत्परतेने काम करेल. जात, धर्म, पंथ अथवा कुठलाही भेदभाव न करता केवळ विकासासाठी आणि जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी या कार्यालयातून प्रभावीपणे काम केले जाईल, अशी अपेक्षाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केली. या सोहळ्याला शिवसेनेचे आजी–माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गंगाराम पाटील यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – मुखेड तालुक्यातील सावरमाळ येथील रहिवासी गंगाराम जळागोड खुनिवाड पाटील यांचे वृद्धापकाळाने सोमवार, दि. ३० मार्च रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते १०५ वर्षांचे होते.



कै. गंगाराम खुनिवाड पाटील यांच्या पार्थिवावर सावरमाळ येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात ४ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. विजय खुनिवाड गुरुजी, फोटोग्राफर राजकुमार खुनिवाड यांचे ते वडील होत.

## एलपीजी गॅस सिलेंडर वेळेत मिळावे; ग्राहकांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरात सध्या एलपीजी गॅस टंचाईची समस्या गंभीर बनली असून, गॅस सिलेंडर वेळेत मिळत नसल्याने ग्राहकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. काही गॅस वितरकांकडून शासनाने निश्चित केलेल्या दरांपेक्षा जादा रक्कम आकारली जात असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रार करण्यात आली आहे.

आयएसएलएएम पार्टीच्या वतीने केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्र्यांना पाठविण्यात आलेल्या निवेदनात तिरंगा चौक वजीराबाद, जुना कौठा, हिंगोली गेट, वाजेगाव नाका रोड, आसना, दीप नगर परिसरातील काही LPG गॅस वितरकांविरोधात आरोप करण्यात आले आहेत.

निवेदनात नमूद केल्यानुसार, अनेक गॅस एजन्सीकडून वारंवार "No Stock' फलक लावले जात असून नागरिकांना आणि ऑटो चालकांना तासन्तास प्रतीक्षा करूनही गॅस मिळत नाही. तीन चाकी वाहनांद्वारे वितरण सुरू असले तरी पुरवठा अपुरा असल्याने सर्वसामान्य ग्राहकांची गैरसोय होत आहे. तसेच घरपोच गॅस वितरणाच्या नावाखाली अतिरिक्त पैसे घेतले जात असल्याचा आरोपही करण्यात आला. दररोज बदलणारे दर आणि अतिरिक्त आकारणीमुळे नागरिकांची आर्थिक अडचण वाढत असल्याची भावना करण्यात आली आहे.

## सुभाष पवार यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – येथील पवार टेन्ट हाऊसचे सुभाष पवार यांचे सोमवार, दि. ३० मार्च रोजी अल्पशा आजाराने निधन झाले आहे. मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता विजयनगर येथून त्यांची अंत्ययात्रा निघणार असून, गोवर्धनघाट येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, भाऊ, बहीण असा परिवार आहे.



## विमानतळ पोलिसांच्या कारवाईत दोन तलवार, एक खंजर जप्त; तीन जणांना केली अटक

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहराच्या विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक संतोष जोंधळे यांनी कारवाई करून तीन जणांना अटक केली. या तिन्ही चोरट्यांकडून दोन तलवार, एक खंजर आणि एक दुचाकी असा मुद्देमाल जप्त करून गुन्हा दाखल केला आहे.

विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या गुन्हेगारांवर वचक बसण्यासाठी व गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे यांनी आपल्या सहकाऱ्यांना गस्त घालण्याच्या सूचना दिल्या. यावरून गुन्हे शोध पथकाचे सपोनि संतोष जोंधळे व अंमलदार हे दि. २९ मार्च रोजी पहाटे दोन वाजताच्या सुमारास विमानतळ हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना त्यांना खबऱ्यांकडून माहिती मिळाली की, नाथनगर नांदेड येथे रोडवर तीन जण तलवार व खंजर हातात घेऊन दुचाकी



(क्र.MH २६-CR-०८०३) वरुन रस्त्याने लोकांमध्ये दहशत निर्माण करत फिरत आहेत. यानंतर डी. बी. पथक तसेच नमूद पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी दोन पंचांसह तत्काळ सदर ठिकाणी जाऊन संशयीतांना ताब्यात घेतले.

## फेब्रुवारी–मार्चच्या १० वी व १२ वी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांनी क्रीडा सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** –माहे फेब्रुवारी- मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांचे क्रीडा सवलतीचे प्रस्ताव आपले सरकार या पोर्टलवर URL: https://aaplesarkar.mahaonline.gov.in लिंकव्दारे सादर करण्यास उपलब्ध करून दिले असल्याचे सचिव, राज्य मंडळ, पुणे यांच्यामार्फत कळविले आहे.

फेब्रुवारी–मार्च २०२६ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षांचे निकाल मागील वर्षीप्रमाणे लवकर जाहिर करण्याच्या दृष्टीने क्रीडा सवलतीचे प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडून विभागीय मंडळाकडे आपले सरकार या पोर्टलव्दारे ऑनलाईन पध्दतीने User Manual मध्ये नमूद केल्याप्रमाणे ऑनलाईन प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन दि. १५ एप्रिलपर्यंत स्वीकारण्याबाबत कळविण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने नांदेड जिल्ह्यातील विद्यार्थी शाळा कनिष्ठ महाविद्यालय यांनी क्रीड़ा गुण सवलतीचे प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड यांचेकडे ऑनलाईन पद्धतीने अर्ज प्रस्ताव सादर करण्यासाठी ऑनलाईन प्रणाली उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यानुसार आपले सरकार या पोर्टलवर URL: https://aaplesarkar.mahaonline.gov.in या लिंकव्दारे विद्यार्थी शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज पाठवावयाचे आहेत. तसेच पोर्टलवर अर्ज भरताना अडचण आल्यास विद्यार्थ्यांनी पोर्टलवरील Toll Free कमांकावर संपर्क साधावा व क्रीडागुण प्रस्ताव सादर करणेसंदर्भात काही अडचण आल्यास या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

खेळाडू विद्यार्थ्यांचे क्रीडा प्रस्ताव विहित कागदपत्रे सादर न केल्यामुळे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून अपात्र केल्यास, अशा प्रस्तावातील कागदपत्रांची त्रुटीची पुर्तता करून संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे सादर करण्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थी शाळा कनिष्ठ महाव्दिालयांची राहील. तसेच संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी देखील त्रुटीचे प्रस्ताव शाळेचे कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणून द्यावेत, कारण त्रुटी अभावी जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडून अपात्र केलेले प्रस्ताव ऑनलाईन प्रणालीमध्ये दिसत नाही व मुदतीनंतर असे प्रस्ताव ऑफलाईन पध्दतीने गुण देण्यासाठी मंडळ कार्यालयास सादर करण्यात येतात.

जिल्ह्यातील विद्यार्थी शाळा, कनिष्ठ महाविद्यालय यांनी क्रीडा गुण सवलतीचे प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड यांचेकडे आपले सरकार या पोर्टलवर URL https://aaplesarkar.mahaonline.gov.in या लिंकव्दारे विद्यार्थी शाळा कनिष्ठ महाविद्यालय यांनी ऑनलाईन पध्दतीने दि. १५ एप्रिलपर्यंत अर्ज पाठविण्यात यावे. तसेच यामध्ये जिल्ह्यातील एकही खेळाडू क्रीडागुण सवलतीपासून वंचित राहणार नाही याची संबंधित खेळाडू, प्राचार्य मुख्याध्यापक यांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले आहे.

## वाजेगाव येथील स्फोटकाच्या घटनेची 'एनआयए'मार्फत चौकशीची मागणी



**नांदेड (प्रतिनिधी)** –रमजान ईदच्या दिवशी वाजेगाव येथील ईदगाह परिसरात झालेल्या स्फोटकाची एनआयएमार्फत चौकशी करावी, अशी मागणी खा. प्रा. रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या एका शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे केली आहे.

नांदेड शहरात दि.२१ मार्च रोजी रमजान ईदनिमित्त सकाळी ईदगाह मैदानावर नमाज पठण करण्यासाठी हजारो मुस्लीम बांधव एकत्र जमले होते. वाजेगाव ब्रिजवरुन दुचाकीवर ईदगाह परिसरात घुसण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका तरुणाचा स्फोटात मृत्यू झाला आहे. या स्फोटाची माहिती अद्यापपर्यंत जनतेसमोर आली नाही. त्यामुळे हा काही घातपात असल्याची शंका नागरिकांमध्ये निर्माण होऊ लागली आहे. या घटनेची केंद्रीय गृह मंत्रालय व एनआयए मार्फत सखोल चौकशी करावी, अशी मागणी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने निवेदनात केली आहे.

यावेळी खा. प्रा. रविंद्र चव्हाण, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष हणमंत पाटील बेटमोगरेकर, राजेश पावडे, माजी महापौर अब्दुल सत्तार, सुरेंद्र घोडजकर, डॉ. श्रावण रॅपनवाड, एकनाथ मोरे, नगरसेवक बाबुभाई खोकेवाले, शेरअली, आनंद चव्हाण, डॉ. रेखा चव्हाण, रामदास पाटील सुमठाणकर, मुन्ना अव्वास हुसेन, फारुख अली, डॉ. दिनेश निखाते, शेख पाशा, नगरसेवक सय्यद शोएब, काजी नाफे, मोहसीन खान, सत्यपाल सावंत, मोहंमद इब्राहीम यांच्यासह काँग्रेसचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com